
२८६६
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : प्रा.वा.
दा. क्र. २८६६



# ...ले ...या !

प्र. के. घाणेकर

BVBK-0402866

गो.वा.
२८६६
२६।११।८३

# किल्ले पाहूया !

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. २८६६ दिनांक २६।११।८३
विषय गो.वा. क्र. . . . . . . . .

प्र. के. घाणेकर

प्रकाशक

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह.

BVBK-0402866

स्नेहल - १०७

प्रकाशिका-मुद्रक
सौ. अंजली रवीन्द्र घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
३६ ब, गुरूदत्त सहवास, दक्षिणामुखी मारूतीजवळ,
४७०/४९८ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन : ४५ २९ ११.

मुखपृष्ठ पारदर्शिका
प्र. के. घाणेकर

मुखपृष्ठ सजावट
श्री. अनिल उपळेकर

प्रथम आवृत्ती - ऑगस्ट १९९३.

मुद्रणालय
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

टाईपसेटिंग
प्रकाश एन्टरप्रायझेज
५/१५, 'अर्चना' बिल्डींग,
हॉटले स्वीकारजवळ, एरंडवणा,
पुणे ४११ ०३०.
फोन : ४३ ८३ ७३.

मूल्य : ३० रूपये.

# मनोगत

किल्ले म्हणजे महाराष्ट्राचे वैभव. भुईकोट, डोंगरी किल्ले, पाणकोट आदिंच्या जिवावर श्रीशिवछत्रपतींनी इथे देशी हिंदवी स्वराज्य उभारले. अलिकडेच 'ट्रेकिंग'च्या छंदामुळे अनेकजण या गटकोट किल्ले अन् दुर्गांवर जातात. पण तिथे कसे जावे? काय पहावे? हे सारं माहिती नसते. त्यामुळे या किल्ल्यांच्या सहलींमधून दमण्याखेरीज फारसे काही हाती लागत नाही.

मागे मी 'साद सह्याद्रीची, भटकंती किल्ल्यांची' असं सुमारे शंभर किल्ल्यांची माहिती देणारे पुस्तक लिहिले. त्याच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. आता तर त्याचे इंग्लिश भाषांतरही प्रसिद्ध होत आहे. पण त्या पुस्तकाची किंमत आणि आकार विचारात घेतला, तर ट्रेकवर ते बरोबर वागवणे शक्य होत नाही. म्हणूनच त्याचे सोयीस्कर असे सहा भाग पाडून ते प्रसिद्ध करावेत अशी मागणी अनेक वाचकांनी अन् दुर्गप्रेमींनी केली. त्याचाच परिपाक म्हणजे हा सहा पुस्तकांचा संच. किंमत अन् आकारमान लक्षात घेतलं तर ही पुस्तकं ट्रेकवर जाताना- गड किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट देताना बरोबर नेणे अन् वागवणे सोयीचे ठरावे.

दुर्गप्रेमी वाचक त्यांचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**– प्र. के. घाणेकर.**
**१०५, नारायण पेठ,**
**पुणे – ४११ ०३०.**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. अर्नाळा | |
| २. अवचितगड | ७ |
| ३. कुलाबा किल्ला उर्फ अलिबागचा पाणकोट | १० |
| ४. कर्नाळा | १७ |
| ५. कांगोरी उर्फ मंगळगड | २२ |
| ६. पद्मदुर्ग आणि कांसा उर्फ प्रदुर्ग | २७ |
| ७. खांदेरी आणि उंदेरी उर्फ जयदुर्ग | ३० |
| ८. खेडदुर्ग उर्फ सागरगड | ३६ |
| ९. चंदेरी | ४० |
| १०. जंजीरा उर्फ जझीरे मेहरुब | ४३ |
| ११. मलंगगड उर्फ श्रीमलंग | ५० |
| १२. माहुली-पळसगड आणि भंडारगड | ५४ |
| १३. मुंबई | ६० |

[illegible] वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २८६६ दिनांक ......

# १. किल्ले अर्नाळा : (जि. ठाणे)

**बेटावरील बलाढ्य किल्ला.**

वैतरणेच्या मुखावर समुद्रकिनाऱ्यापासून पाव कि.मी वर असणारा हा जंजीरा उत्तर कोकणातील वसईखालोखाल अतिशय प्रबळ समजला जातो. या सागरी किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे कमी-जास्त लांबीच्या पण साधारणत: १० मीटर उंचीच्या भिंतीची तटबंदी इतकी मजबूत आहे की त्याभोवती खंदक वगैरे खोदावयाची कधीही आवश्यकता भासली नाही.

ह्या बलवान दुर्गाचे दर्शनार्थ मुंबईहून वसई गाव किंवा विरार येथून सुटणाऱ्या, राज्य परिवहनाच्या बसने अर्नाळा या गावी यावे. तेथून सुमद्रकिनाऱ्यापासून मोटार लाँचने अगर पडावाने थेट अर्नाळा किल्ला असलेल्या बेटावर जाता येते.

किल्ल्याच्या उत्तरेकडील दरवाजा हा खरा मुख्य प्रवेशमार्ग. कमानीच्या शिरोभागी या दरवाज्याचा जीर्णोध्दार श्रीमंत बाजीराव (पहिले) पेशव्यांनी केल्याचा उल्लेख असणारा शिलालेख आढळतो. बाजी तुळाजी या स्थपतीची त्यांनी या कामी मदत घेतल्याचे आढळते.

दरवाज्याच्या पाषाणी चौकोटीवर वाघ-हत्तींच्या प्रतिमा व शुभसूचक अशा कमलफुलांचे कोरीव काम केलेले आढळते. दरवाज्याच्या आतील देवड्यांवरदेखील कोरीव काम आढळते. डाव्या हाताने आत गेल्यावर आतील सर्व परिसर दृष्टीस पडतो. नजरेत भरते किल्ल्यामधील त्रिंबकेश्वराचे मंदिर. कोकणातल्या इतर देवळांप्रमाणे ते छोटेखानी व कौलारू आहे. मंदिरामागे बांधीव अष्टकोनी पुष्करणी आहे. तसेच देवळाचे प्राकारात श्री गजाननाची एक मूर्ती आहे. याशिवाय पूर्वेच्या तटामध्ये एका घुमटीत श्री नित्यानंद महाराजांच्या पादुका असून त्याच ठिकाणी

त्यांचे काही दिवस वास्तव्य होते. याशिवाय श्रीभवानीचे एक मंदिर पश्चिमेकडे आहे. शाह अली व हाजी अली या दोन मुस्लिम संतांचे पीर असलेली एक इमारत असून तिची बांधणी देवळाप्रमाणेच आहे.

किल्ल्यामध्ये गोड पाण्याच्या काही विहिरी आहेत व त्यातूनच या बेटावरील लोक पाणी नेतात. किल्ल्याच्या तटाबाहेर बेटावरील वस्ती आहे. त्या वस्तीतच एक देवीचे देऊळ आहे. ही वस्ती प्रामुख्याने कोळी लोकांची आहे.

**योजनाबध्द रचना.**

किल्ल्याखेरीज ऐतिहासिक कालातील आणखी एक इमारत बेटावर आहे. संपूर्ण गोल असा एक सुटा बुरूज बेटाच्या दुसऱ्या टोकास आहे. यामध्ये प्रवेश करण्यास अगदी लहान असा खिडकीवजा मार्ग आहे, परंतु अतिशय अंधाऱ्या अशा या मार्गातून जाणे मोठे अवघड आहे. अनेक दिवस दुर्लक्ष झाल्याने साप आदिंचे भय आहे. पूर्वी टेहाळणीची व माऱ्याची जागा म्हणून या स्थानाचा वापर होत असावा.

किल्ल्याच्या तटामध्ये ठिकठिकाणी खोल्या केल्या आहेत. पहारेकऱ्यांच्या विश्रांतीसाठी त्यांचा वापर केला जात असे. किल्ल्यात व किल्ल्याबाहेर आंबा, वड, चिंच, ताड, माड, यांची विपुल झाडी आहे. सतत वाहणाऱ्या गार वाऱ्यामुळे या भागातील वास्तव्य सुखाचे असते.

इ.स. १५३० मध्ये गुजरातच्या सुलतानाच्या ताब्यातील या पाणकिल्ल्याचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रांत आढळतो. पुढे वसईच्या किल्ल्याबरोबर या किल्ल्याचाही ताबा पोर्तुगीजांकडे गेला. त्यानंतर १७३७ मध्ये याचा ताबा मराठ्यांकडे आलेला आढळतो. आगाशीकडून आलेल्या आक्रमक ब्रिटीशांना अतिशय प्रखर प्रतिकार

करून अगदी नाइलाजाने तेथील शिवबंदीने हा किल्ला शत्रूच्या ताब्यात दिला. किल्ल्याची संरक्षणव्यवस्था आजदेखील उत्तम स्थितीत आहे.

मुंबईकरांना वसईच्या किल्ल्याबरोबरच याही स्थळाचे दर्शन घेऊन एका दिवसात दोन पुण्यक्षेत्रांच्या दर्शनाचे श्रेय घेता येईल.

१९८० साली इथे एक अद्‌भूत घडले. किल्ल्याच्या पश्चिमेस खडकाळ-भुसभुशीत जमिनीत चक्क पारा सापडला. मात्र त्यानंतर व्यापारी तत्त्वावर इथे पाऱ्याचे उत्पादन केल्याचे आढळत नाही. त्यातील अडचणीही कळल्या नाहीत.

## २. किल्ले अवचितगड : (जि. रायगड)

कुलाबा जिल्ह्यातील रोहा शहरानजीक कुंडलिका नदीपासून अवघ्या पाच कि.मी. उत्तरेस एक छोटेखानी किल्ला आहे. अवघ्या ३२० मीटर उंचीच्या ह्या किल्ल्याचे नाव आहे अवचितगड. सह्याद्रिच्या मुख्य रांगेपासून फुटून सिंधुसागराकडे धावणाऱ्या एका उपफाट्यावर हा किल्ला बांधलेला आहे. ह्या डोंगररांगेच्या उत्तरेस आहेत. अलिबाग अन् पेण तालुके, तर दक्षिणेस रोहा व मुरूड जंजीरा तालुके आहेत.

किंचितसा घोड्याच्या नालेसारखा किंवा दुध्याभोपळ्याच्या आकाराचा किल्ला अवघा तीनशे मीटर लांबीचा आहे. तर पायथ्यापासूनची उंचीदेखील अदमासे अडीचशे मीटरच्या आसपास असावी. रोह्याहून कुंडलिकेवरचा पूल ओलांडून पिंगळसईमार्गे किल्ल्यावर अवघ्या तासाभरात जाता येते, किंवा मेढामार्गेही जाता येते.

सर्व बाजूंनी तट-बुरुजांनी बंदिस्त असणारा हा किल्ला

मुख्यत्त्वे संरक्षक ठिकाण म्हणूनच वापरला जात असावा. गडाच्या दक्षिणेकडची बाजू साधारणपणे सरळ अशा भिंतीने बांधून काढलेली असून त्या बाजूच्या बुरुजावर एक शिलालेख एका दगडावर कोरलेला आढळतो.

श्री.
श्री. गणेश
। य नमा श्री बा
म संवत्सरे चैत्र सु
द १ प्रतिपदा.
प देव सके
१७१८ नलना

असे या शिलालेखाचे वाचन आहे. म्हणजे या शिलालेखाचा काल इ.स. १७९६ आहे. कदाचित त्यावर्षी हा बुरुज उभारला गेला असण्याची शक्यता आहे. परंतु शिवरायांचे समकालीन बाजी पासलकरांचा ह्या किल्ल्याशी आलेला संबंध पाहता इ.स. १७९६ मध्ये ह्या किल्ल्याची डागडुजी वा फेरउभारणी केली असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. ह्या बुरुजाचे माथ्यावरून कुंडलिका नदी, रोहा शहर, रायगड, लिंगाणा, तोरणा ऊर्फ प्रचंडगड, राजगड आणि कोंढाणा ऊर्फ सिंहगड सहज नजरेस पडतात. तसेच पेण तालुक्यातील बराचसा भूप्रदेश, बोरघाट ऊर्फ खंडाळ्याच्या घाटातील नागफणीचे टोक व परिसर आणि नैऋत्येकडे जंजीरा भागातील टेकड्याही चांगल्या हवेत दिसू शकतात.

गडावर आजमितीस देखील ४-५ तोफा नजरेस पडतात. गडावर एक गडाच्या मानाने मोठा तलाव तर आहेच. पण त्याशिवाय त्याचा आकार द्वादशकोनी असून, बांधीव आहे. दोन टोकांतील अंतर चाळीस मीटरपर्यंत भरेल. बालेकिल्ल्यातील या तलावाच्या पश्चिमेस सात टाक्यांचा एक समूह आहे. या टाक्यांजवळच

पिंगळसई देवीची घुमटी आहे. आणखी एक घुमटीत शेंदूर लावलेला दगड आहे, तो किल्ल्यावरील बाजी पासलकर या मुख्याचा आहे असे मानतात. वस्तुतः सासवडला बाजी पासलकरांची समाधी आहे. तेव्हा अवचितगडावरील ही स्मारक घुमटी अन्य कोणा बाजींची किंवा बापूजी पासलकरांची असावी असा तर्क आहे.

या टाक्यांजवळच एक दीपमाळ आहे. टाक्यांचे बाजूस तळाशी एक मानवी आकृती शस्त्रासह कोरलेली असून काही अस्पष्ट अक्षरेही या स्तंभावर आहेत. गडावर अन्यत्र एक महादेवाचे पडीक मंदिर असून जवळच गणपती, पार्वती व विष्णु यांचीही स्थाने आहेत.

प्रचलित माहितीनुसार ह्या किल्ल्याची उभारणी अचानकपणे व घाईगर्दीत शिवाजी राजांनी केली म्हणून गडाचे नाव 'अवचितगड!' तसेच ह्या उभारणीत शेख महम्मद या स्थपतीने बहुमोल मदत केल्याचे आढळते. परंतु हा किल्ला एक लष्करी ठाणे म्हणून याचा वापर होत असावा आणि निजामशाही अमलात सुभ्याचे एक ठिकाण म्हणून याचा वापर होत असावा असे दिसते. म्हणजेच शिवाजी महाराजांनी याची पुनर्बांधणी केली असण्याचाही संभव आहे.

सुरगड, पाली व भोरपबरोबरच अवचितगडाचाही ताबा इ.स. १८१८ च्या शेवटच्या इंग्रज-मराठे युध्दात कर्नल प्रॉथरने घेतला असा स्पष्ट उल्लेखही आढळतो.

पूर्वेकडील सह्यगिरीच्या रौद्रभीषण डोंगररांगा व बऱ्याच पक्ष्यांचे अस्तित्त्व यामुळे किल्ल्यावरील छोटी सहल तापदायक होत नाही. खुद्द किल्ल्यावर प्रेक्षणीय अशा वास्तू वगैरे काहीही नाहीत. पण गडाखालच्या पिंगळसई गावातील श्रीगजाननाचे भव्य मंदिर पाहण्यासारखे आहे.

# ३. अलिबागचा पाणकोट (किल्ले कुलाबा), सर्जेकोट व हिराकोट : (जि. रायगड).

**अष्टागराचे स्वामी.**

सुमारे तीस किलोमीटर लांबीची अलिबाग तालुक्यातील किनारपट्टी अष्टागर या नावाने ओळखली जाते. चौल, अक्षी, नागाव, अलिबाग, साखर, थळ, आवास अन् किहीम ही प्रमुख बागायती गावे यात मोडतात. पूर्वेला सह्यगिरी तर पश्चिमेस सिंधुसागर, आणि उत्तरेला रेवसची खाडी तर दक्षिणेस रेवदंड्याची खाडी या अष्टागराची भौगोलिक मर्यादा. नारळी-पोफळी पिकवणारी ही अष्टागराची भूमी सपाट, पाणथळ व सुपीक आहे.

अष्टागर ही च्यवनऋषींची तपोभूमी. भगवान श्रीकृष्णांचे पायही या भागाला लागले होते हा दृढ समज आहे. बौध्दांनी येथे लेणी कोरली, तर जैनांनी इथे मंदिरे उभारली. कनकेश्वरचा महादेव, चौलची शितळादेवी, आवासचा नागोबा अन् डोंगरावरचा दत्त ही इथली प्रसिद्ध दैवते. हिंदवी स्वराज्यात कान्होजी आंग्र्यांच्या रुपाने एक कर्तुमअकर्तुम सत्ता या प्रदेशात साकारली.

अलिबागचा पाणकोट ऊर्फ कुलाबा किल्ला, हिराकोट, सागरगड ऊर्फ खेडदुर्ग, श्रीवर्धनगड ऊर्फ मांडव्याची गढी, मनरंजनकोट ऊर्फ रेवसची गढी, स्मृतिशेष झालेला आवासचा किल्ला, थळचा खूबलढा किल्ला, रामदरण्याचा किल्ला, खांदेरी-उंदेरी हे जंजिरे, रेवदड्यांचा भुईकोट अन् चौलचा राजकोट अशी दुर्गमालिका या प्रदेशाची तारणहार झाली.

आजमितीस पडझडीमुळे अन् आपल्या उदासीनतेते या बलदंड दुर्गांची अगदी वाट लागली आहे. या किल्ल्यांचा राजा अन् अष्टागराचा स्वामी म्हणजे किल्ले कुलाबा किंवा अलिबागचा पाणकोट!

**खांदेरी-उंदेरी या दोघी जावा ।**
**मधे कुलाबा खातो हवा ॥**

अशा काव्यपंक्ती येथील लोकगीतात आढळतात.

रायगड जिल्हा आता विकासाकडे वेगाने वाटचाल करीत आहे. पनवेलची रसायनी, संकल्पित कोकण रेल्वे आणि 'मुंबई हाय' वर आधारित थळ-वायशेतचा राष्ट्रीय खत प्रकल्प यामुळे येथील सारे जीवनच बदलून चालले आहे. अनेक देशी, परदेशी व स्थानिक लोकांमुळे हा परिसर गजबजून जाऊ लागला आहे. या साऱ्यांना फुरसतीचे चार क्षण घालवावे असे वाटले तर काही लांब जावे लागत नाही. कनकेश्वराचा दाट झाडीने वेढलेला डोंगर, किहीम आवासच्या रम्य पुळणी, मांडव्याची दीपमाळ, सागरगड ऊर्फ खेडदुर्ग, चौलरेवदंड्याचा रम्य बागायती परिसर आणि अलिबागच्या पुढ्यात असणारा कुलाब्याचा किल्ला ही स्थळे पर्यटन दृष्ट्या विकसित करता येतील.

**तेजस्वी इतिहास.**

शिवरायांनी सिंधुदुर्ग, अंजनवेल असे काही सागरी दुर्ग नव्याने उभारले, तर विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, कुलाबा असे जुने किल्ले दुरूस्त करून अधिक भक्कम केले.

ज्या बंदरास मोहरी किल्ला किल्ल्याचे
दहशतीने गनीम खाडीत
शिरो न शके, अथवा खाडीस, खाडीत आरमाराची छावणी
करावी..आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यांगच आहे...

हे सारे विचार आपणास कोकणातील जलदुर्गांविषयी शिवशाहीतील कागदपत्रांत आढळतात. १६६१ च्या सुमारास शिवरायांनी आरमाराची स्थापना केली. माऱ्याच्या खंबीर जागा हुडकून तेथे नवे किल्ले बांधले. जुने अधिक भक्कम केले. या

कामी स्थानिक जनतेचे अफाट सहकार्य त्यांना लाभले.

तुकोजी संकपाळ हा आंगरवाडीचा रहिवासी. या नूतन आरमारात त्याने वरची जागा आपल्या अंगगुणांवर पटकाविली. याचा मुलगा कान्होजी! सिधोजी गुजर या आरमाराधिपतीचे निधन झाल्यावर त्या जागी कान्होजी आंग्रे यांची १६९८ मध्ये राजाराम महाराजांनी निवड केली. पुढे शाहूराजांच्या आगमनानंतर घडलेल्या सत्तासंघर्षात बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी अतुलनीय कामगिरी बजावली. दिल्लिंद्राच्या आलमगिरी वावटळीतदेखील किनारपट्टीचा मुलुख सांभाळणारे हे आंग्रे, शाहूपक्षाला या पहिल्या पेशव्यानेच आणले. अष्टागरातले खांदेरी सागरगड ऊर्फ खेडदुर्ग अन् अलिबागचा कुलाबा किल्ला अन् त्याखालचा मुलूख आंग्र्यांकडेच ठेवून शिवाय 'सरखेल' ही पदवी त्यांना देवविली. ४ जुलै १७२९ रोजी या कोकणपुत्राचे, नव्हे सागरराजाचे अलिबागला निधन झाले. मग कान्होजींचा मुलगा सेखोजी अधिकारावर आला. सेखोजीही अवघ्या चार वर्षात निधन पावला. मग त्याचा भाऊ संभाजी हा तळकोकणात विजयदुर्गला स्थायिक झाला होता. म्हणून येसाजीस मुलकी कारभार अन् मानाजीस लष्करी कारभार सांगितला गेला. पण मानाजीनेच येसाजीचे डोळे काढले व पोर्तुगीजांशीही सलोखा केला. दरम्यान संभाजी आंग्र्यांने कुलाब्यावर स्वारी केली. खरं तर दोघेही छत्रपतींचे सेवक, पण आरमारी बळाचा गर्व चढून शत्रूच्या विरुध्द वापरावयाचे आरमार स्वकीयांविरूध्द वापरले गेले. पेशव्यांनी मानाजी या दरबारी मानकऱ्यांची बाजू घेतली. त्या वेळी रेवदड्यांची जागा पोर्तुगीजांना हवी होती, ती मानाजीने न दिल्याने पोर्तुगीज व संभाजी आंग्रे यांनी स्वराज्यावर चाल केली. शाहू छत्रपतींच्या आज्ञेने बाजीरावाने वेळीच हालचाल केली व धोका टळला. पुढे १७४७ मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दीने केलेल्या चढाईत मानाजी आंग्र्यांने थळच्या खूबलढा किल्ल्याशी सिद्दीचा

पराभव केला.

१७५९ मध्ये मानाजी वारल्यावर रघुजी सत्ताधिष्ठित झाला. तो मेल्यावर मानाजी व कान्होजी हे अल्पवयी मुलगे अन् जयसिंग हा दासीपुत्र यांमध्ये बराच कुटुंबकलह झाला. येसाजी आंग्र्यांचा मुलगा बाबुराव हाही यात ओढला गेला. पुढे १८१३ मध्ये बाबुराव मेला अन् मानाजी आंग्र्यांकडे सर्व अधिकार आला. १८१७ मध्ये तो मेल्यावर इंग्रजांनी राघोजीस गादीवर आणले व बिवलकरांकडे कारभारी पद दिले. त्याच्या पश्चात कान्होजी या त्याच्या मुलास अधिकार मिळाले. पण १८४० मध्ये तो निपुत्रिक मेल्याने हे राज्य इंग्रजांनी खालसाच केले.

**किल्ल्याचे दर्शन.**

अलिबागच्या किनाऱ्यापासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर दक्षिणोत्तर पसरलेला एक खडक आहे. त्यावर तीनशे मीटर लांब अन् किंचित अधिक रुंद असणारा हा किल्ला दगडाचे अवाढव्य चिरे नुसते एकमेकांवर ठेवून उभारला आहे. जंजिऱ्याचा चुना व सिंधुदुर्गाचे शिसे हे दोन चिऱ्यांमधील सिमेंटिंग मटेरियल. येथे तर दोन्हीचाही अभावच आहे. या किल्ल्याला सतरा बुरूज आहेत. चार कोपऱ्यांत चार, सिंधुसागराचे बाजूस पाच, किनाऱ्याच्या कडेला चार, तर उत्तरेस तीन अन् दक्षिणेस एक बुरूज आहे. गडाचे मुख्य प्रवेशद्वार किनाऱ्याच्या बाजूस ईशान्येकडे वळलेले आहे. त्यावर अप्रतिम अशी द्वारशिल्पे आहेत. कमळाकृतीशिवाय मोर, हत्ती, हरण, शरभ अशी शिल्पेही येथे आहेत. दारासमोर काही निकामी बोयेही पडलेले आढळतात. यानंतर आता ढासळलेला द्वितीय दरवाजा आहे. याखाली विस्तीर्ण तळघर आहे. सतरापैकी काही बुरुजाना नावेही आहेत. पिंजरा, नगारखानी, तोफखानी, दारुखानी, गणेश, सूर्य, हनुमंत ही काहींची नावे. या पाणकोटाला

आणखीही एक द्वार आहे त्याला धाकटा दरवाजा किंवा यशवंत दरवाजा म्हणतात. कोणी कोणी त्यालाच दर्या दरवाजाही म्हणतात. तो दक्षिणेस आहे. या दरवाज्यावर गरुड, गणपती, मारुती हे देव आणि सागरी सत्तानिदर्शक मगरी, कमळे व वेलबुट्टी अंकित केली आहेत. येथे जवळच द्वाररक्षक देवतेचा शेंदूर फासलेला दगड आहे. दाराजवळच कान्होबाची घुमटी आहे. तटालगतच कान्होजी आंग्र्यांची गोदी होती. तिचे अवशेषही आढळतात.

आजही सुस्थितीत असणारी वास्तू म्हणजे सिध्दी विनायकाचे गणेश पंचायतन असणारे गणपती मंदिर. अदमासे २० मीटर लांब, ६ मीटर रूंद अन् १५ मीटर उंचीचे हे गणेश मंदिर १७५९ मध्ये रघोजी आंग्र्यांने बांधले. ४५ सेंटीमीटर उंचीची संगमरवरी गणेशमूर्ती काही एकटी नाही. ते आहे गणेश पंचायतन. गणेशमूर्तीच्या मागे डाव्या हातास विष्णू तर उजव्या हातास शंकर आणि पुढील बाजूस डाव्या हातास देवी व उजव्या हातास सूर्य अशी ही रचना आहे. मंदिराच्या प्राकारातच उंच कट्ट्यावर उत्तरेस मारुतीचे व दक्षिणेस महादेवाचे स्वतंत्र मंदिर आहे. मंदिराच्या प्राकारासमोर चिरेबंदी बांधणीची, गोड्या पाण्याची पुष्कर्णी आहे. तिथेच कोनाड्यात सात आसरा या देवता आहेत. याशिवाय मुख्य दरवाज्यातून आत आले की, श्रीपद्मावतीची घुमटी आहे. तर दक्षिणेस गुलबाई ऊर्फ महिषासुरीचे छोटे मंदिर आहे. चतुर्भुजा देवीच्या वरच्या डाव्या हातात परळ, खालच्या डाव्या हातात रेड्याची जीभ आहे. वरच्या उजव्या हातात रेड्याची पिरगाळलेली शेपटी तर खालच्या उजव्या हातात रेड्याच्या शरीरात खुपसलेला त्रिशूळ आहे. येथे जवळच एडका, काळवीट व पक्षी कोरलेली शिळा आहे. याजवळ श्रीभवानी ऊर्फ गडदेवतेचे मंदिर आहे. त्याच देवळात वेताळ व गणपतीही आहेत. येथे दर चैत्रीपौर्णिमेस यात्रा भरते. शिवाय दर चतुर्थीला अलिबागकर व अन्य अनेकांची

गणेश पंचायतनाचे दर्शन घेण्यास झुंबड उडते.

परदेशी बनावटीच्या दोन अजस्त्र तोफांची धुडे ज्या बुरुजावर आहेत. तेथे उभे राहिले की खांदेरी व उंदेरी ऊर्फ जयदुर्ग हे किल्ले उत्तरेला दिसतात. तर सागरगड अन् कनकेश्वराचे डोंगर पूर्वेला दिसतात. दक्षिणेस कोर्लई किल्ला दिसतो.

महाद्वार ते गणेशमंदिर या भागात आंग्रे सरकारचे वाडे विपन्नावस्थेत आहेत. १७७० मध्ये पिंजरा बुरूजाशी आग लागली. मग क्रमाने फडणिसांचे घर, बुरूज अशी ती पसरत गेली. जुना वाडा, काठ्या, पागा, हवेली, कान्होबाचा मठ आदि वास्तू त्यात भस्मसात् झाल्या. १७८७ मध्ये आंग्र्यांचा वाडाही असाच जळाला. येथे लागलेल्या पाच आगींशिवाय पाच मजली थोरल्या वाड्याची ऊर्फ नानासाहेबांच्या वाड्याची हकिकत अधिक करुणास्पद आहे. १८१६ मध्ये वास्तुशांत झाली पण अवघ्या सव्वीस वर्षांनी १८४२ मध्ये इंग्रजांनी यातील लाकडी सामान लिलावात फुंकून टाकले व दगडांच्या चिऱ्यांचा उपयोग अलिबाग वॉटरवर्क्स उभारण्यास केला. दक्षिण तटानजीकच्या वाड्यात मध्यभागी अंधार बाव ही विहीर आहे.

**सर्जेकोट.**

कुलाबा किल्ल्याला चिकटून पण थोडा सुटावलेला असा हा गढीवजा किल्ला किंवा उपदुर्ग आहे. अदमासे २६ मीटर लांब व २६ मीटर रुंद पण गोलाकार असा हा छोटा किल्ला आहे. त्याला तट, तटावर मारगिरीच्या जागा, मध्यभागी पाण्याचा आड अशी ही रचना आहे. कुलाबा किल्ल्यापासून सर्जेकोटपर्यंत एक दगडी सेतू किंवा कॉजवे बांधलेला होता.

**हिराकोट.**

अलिबाग शहराच्या वायव्येस किनाऱ्याजवळच ही वास्तू आहे. १७२० मध्ये कान्होजी आंग्र्यांनी याची उभारणी केली. बाज़ीराव पेशव्यांच्या कर्तृत्त्वाला अवघ्या विसाव्या वर्षी येथेच सुरुवात झाली ती संभाजी आंग्र्यांविरुध्द मानाजी आंग्र्यांच्या मदतीला बाजीराव पेशवे गेले असताना. केनिया देशात एक ट्री टॉप हॉटेल आहे. सध्याची इंग्लंडची राणी या ठिकाणी एकदा मुक्कामाला आली, तेव्हा ती होती राजकुमारी. पण त्याच रात्री इंग्लंडचा राजा मृत्यू पावला. त्यामुळे ती बाहेर पडली ती राणी म्हणून. तसंच काहीसं या हिराकोटात बाजीराव पेशव्यांच्या बाबतीत झालं. त्याचं काहीच अप्रूप आपल्याला नाही. १८४० मध्ये आंग्र्यांकडून याचाही ताबा इंग्रजांनी मिळवला.

**कुलाब्याची वेधशाळा.**

मुंबईच्या आधुनिकीकरणामुळे त्रस्त झालेली वेधशाळा तिथून हलवून १९०७ मध्ये अलिबागला स्थानापन्न झाली. या तऱ्हेची भूचुंबकीय वेधशाळा या भागातील ही एकमेव आहे. ७ मे १९०७ रोजी कार्यरत झालेल्या या वेधशाळेत आधीची १८२६ पासूनची निरिक्षणेदेखील व्यवस्थित जपली गेली आहेत. या वेधशाळच्या अंतर्भागात पूर्ण काळोख असून तेथील सात-आठ यंत्रे भूगर्भातील व भूकवचातील हालचालीची सतत नोंद ठेवीत असतात.

**पर्यटन विकास.**

येथील ऐतिहासिक स्थानांचे महात्तम्य कमी न करता अलिबाग परिसर हा आकर्षण स्थळ करता येईल. उरण, करंजा व धरमतर पूल, रेवस-रेड्डी राष्ट्रीय किनारी रस्ता, कोकण रेल्वे व मुंबईनजीकचे ठिकाण, शिवाय अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण

या गोष्टी लक्षात घ्यावा लागतील.

मराठ्यांच्या आरमाराचे दर्शन घडविणारे तक्ते, नकाशे, फोटो, मॉडेल्स यांचा एक विभाग, आंग्रे घराण्याचा इतिहास, चित्रे यांचा दुसरा विभाग, महाराष्ट्रातील साऱ्या जलदुर्गांचे फोटो व उठावाचा नकाशा असा तिसरा विभाग, अलिबाग परिसरात सापडणाऱ्या शंख-शिंपले-मासे यांची शास्त्रीय माहिती देणारा जलजीवालयाचा चौथा विभाग असणारे एखादे कायमचे वस्तुसंग्रहालय खुद्द किल्ल्यात उभारता येईल.

तटावर वाढणारी झाडे व सतत आदळणाऱ्या लाटा यांच्यापासून या किल्ल्याचे रक्षण करणे अनिवार्य झाले आहे.

समुद्र-पर्यटन, सागरी जलतरण, नौकानयन यांची ओळख करून देणारी, यातील साहसी आव्हानांना तोंड देण्याची कुवत निर्माण करणारी एखादी साहस संस्था या ठिकाणी सुरू करता येईल.

या किल्ल्यात जायचे म्हणजे ओहोटीचे वेळीच आत जाता येते. त्या दिवशी असणाऱ्या तिथीच्या पाऊण पट इतके वाजता पूर्ण भरती असते व नंतर सहा तासांनी पूर्ण ओहोटी असते. पूर्ण ओहोटीचे आगे-मागे दोन तास एवढाच वेळ किल्ल्यात जाऊन येता येते. आत जाऊन किल्ला बघण्यास तेवढा वेळ पुरे होतो.

## ४. कर्नाळा : (जि. रायगड)

किलबिल किलबिल पक्षी बोलती
झुळुझुळु झुळुझुळु झरे वाहती
पानोपानी फुले बहरती
फुलपाखरे वर भिरभिरती

ह्या स्वप्नील गीताचा हा साक्षात अविष्कार!

पुणे-मुंबई-पेण-पनवेल इथल्या भटक्यांना अन् आभाळमित्रांना (पक्षी निरीक्षकांना) कर्नाळा खूपच परिचित. कर्नाळा, प्रबळगड माणिकगड, पिशाळगड, सांकशी, पेब ऊर्फ विकटगड अशा किल्ल्यांना भेट देण्याचा एखादा जंबोट्रेकही अनेकजण करतात. कर्नाळ्याखालचे सारे रान संरक्षित प्रदेश म्हणून राखले गेले आहे. त्यातच अतिदुर्मिळ असा पांढऱ्या सावरीचा एकमात्र वृक्ष आहे. त्याचे जतन-संवर्धन आणि परिचय करून देण्याची गरज आहे. 'पक्ष्यांचा डोंगर' म्हणजे कर्नाळा. पण फार मोठ्या गटाने येऊन गडबड करीत हिंडणाऱ्यांना साधे चिमणी कावळेही दिसत नाहीत. मग पक्ष्यांच्या नावाने बोटे मोडीत परतणारे अनेक जण मी बऱ्याचवेळा पाहिले आहेत. पक्षीराज्यात जायचे तर तिथले संकेत-नीती-नियम-निर्बंध यांचे कसोशीने पालन करायला पाहिजे तरच तो खजिना आपल्यासाठी खुला होतो.

सर्वसाधारणपणे वर्षभरात दीडशे जातींचे पक्षी येथे दिसू शकतात. पण कोणत्याही वेळी गेले तर पन्नास-साठ तऱ्हेचे पक्षी न्याहाळता येतात. मलबार व्हिसलिंग थ्रश, कोकीळ, शामा गप्पीदास, दयाळ, फुलचुखी, तांबट, पिलक, भोरड्या, मैना, आयोरा, बुलबुल, कोतवाल, पॅरेडाईज, फ्लाय कॅचर (नंदन नाचण), लांब शेपटीचा कोतवाल, सुतार, नीलकंठ, भारद्वाज, खंड्या, ससाणा, पांढऱ्या पाठीची गिधाडं, कर्नाळ्याच्या सुळक्यावर घरटी बांधणारा शाहीन ससाणा (शाहीन फाल्कन), वेगवेगळी घुबडं, टिटवी, बगळे, अन् असे कितीतरी पक्षी इथे आढळतात. त्यासाठी बोरमाळ, सरडामाळ, उत्तरेकडील भाग, मोहरमाळ, किल्ला परिसर, ओढ्यालगतचा वायव्य भाग, आपटा-खारपाड बाजूचा दक्षिण भाग अशा ठिकाणी गेलं तर ह्या खगमित्रांचे नीटस दर्शन होते.

अदमासे साडेचार चौरस किलामीटर्सच्या प्रदेशात हे

पक्षी-अभयारण्य साकारले आहे. पाताळगंगेच्या काठी आपटे कल्हा रानसई-चिचवण या गावचौकटीत हे देखण्या वृक्षराजीने सजलेले कवतिक अजून उभे आहे. मुंबईपासून ६२ कि.मी. आणि पनवेलहून १३ कि.मी.अंतरावर असणारे हे ठिकाण मुंबई-गोवा महामार्गावरच आहे.

इथले जंगल तीन थरांत असल्याचे आढळते. तळातील भागात दिंडा, वावडिंग, कढीलिंब, कारवी अशा झुडपांनी गर्दी केल्याचे दिसते. तर मधल्या भागात तामण, कुंभा, पांगारा, उंबर, बहावा, यांची दाटी आहे. वरच्या भागात साग, ऐन, आंबा, जांभूळ, शाल्मली उर्फ काटेसावर, हे वृक्ष व पळसवेल, वाटाळी, वाघाटी आदि वेली वाढल्या आहेत. पावसाळ्यात गेले तर विविध रानहळदी. काळीमुसळी सुवर्णकांतीची सोनकी अशा हरतऱ्हेची रानफुलांची झाडंही दिसतात.

सर्वांना हे पाहाणे जमत नाही. खास त्यांच्यासाठी काही पक्ष्यांनाच बंदिवान करून ठेवले आहे. पोपट, सारिका, मोर, मुनिया, एवढंच नाही तर ससाणे, शिंगचोचा (ग्रेट इंडियन हॉर्नबील), बोलक्या मैना, काही कबुतरं, गुलाबी छातीचे पोपट, पांढरे कवडे, शिंगवाले घुबड अशाही आभाळमित्रांना इथे कोंडून ठेवले आहे. मुक्त अभय प्रदेशातील ही कैद चांगली की वाईट ? कोणी ठरवायचे ? दोन दिवस मुक्काम करून इथले हे रानवैभव लुटायला हवे. उगाचच उडत्या भेटीचे काही खरे नाही. पण इथे राहायचे ठरवले तर परिक्षेत्राधिकारी-कर्नाळा मु.पो.पनवेल, जि.रायगड (दूरध्वनी क्रमांक २७५९) यांच्याकडे आरक्षण करून मगच यावे. इथं शेकोटी पेटवून अन्न शिजवायला बंदी आहे आणि ते योग्यही आहे. आपापली शिदोरी न्यावी. नाहीतर इथल्या उपाहारगृहात, पोटपूजा उरकावी हे बरं. लहान मुलांसाठी झोपाळे, घसरगुंड्या अशी साधनेही आहेत.

पक्ष्यांशिवाय रानडुकरे, भेकरे, सालिंदर, सिव्हेट, रानमांजर, लाल तोडांची माकडे, वानरे, ससे, घोरपड अशा वनचरांचेही इथे दर्शन होत.

हमरस्त्यावरची कर्नाळ्याची खिंड समुद्रसपाटीपासून ८५ मीटर उंचीवर आहे. इथून किल्ल्यापर्यंत जाणारी उत्तम पायवाट आहे. किल्ल्याची सर्वसाधारण उंची ४४५ मीटर आहे. तर सुळक्याचा माथा ४७५ मीटर उंचीवर आहे. कर्ण्यासारखा आकार असणारा म्हणून हा कर्नाळा.

हमरस्त्यापासून चढायला सुरुवात केली की, उत्तर धारेवरच्या सपाटीवर आपण थोड्या वेळात येऊन पोहोचतो. पुन्हा चढण सुरू व्हायच्या आधी देवीची एक घुमटी आहे. तेथून आपण दुर्गद्वारात पोहोचतो. याशिवाय आणखी एका वाटेने कर्नाळा गाठता येतो. पूर्वेकडील गुळसुंदे गावी पनवेलहून गाडीवाटेने किंवा रुळवाटेने यावं. गुळसुंद्याहून चाप्याची वाडी नाहीतर जमन्याची वाडीवरून अडचणीच्या वाटांनी कर्नाळा गाठता येतो. मध्यभागी उंच उंचच सुळका आणि त्याच्या पोटात कोरलेली टाकी, अग्नेय व उत्तरेला माच्या अशी याची रचना आहे. पहिल्या दारावर व्याघ्र, शरभ शिल्पे आहेत. हे दार आता फारच मोडकळीला आले आहे. कमान तर अगदी कोसळायला आली आहे. इथे एक मराठी शिलालेखही आहे. या उत्तर माचीतून जाणाऱ्या वाटेवर आणखी एक शिलालेख वरच्या दारात आहे. 'सय्यद नुरुद्दिन महमद खान हिजरी ११७४' असा उल्लेख या फारशी शिलालेखात आहे. वरच्या किल्ल्यात जायला पूर्वांगाकडून जाणारी हीच एकमेव वाट आहे.

३०-३५ मीटर उंचीचा सुळका देखणा आहे. गो.नी. दांच्या 'जैत रे जैत' मुळे तो अधिक प्रसिध्द झाला आहे. सुळक्याच्या पूर्व पायथ्याशी पाण्याच्या हौदाजवळील झाडाजवळून कड्याशी

जवळीक करावी. तेथून छोटा टप्पा पार केला की थोडी सोपी चढण, मग उत्तम खोबणी-पकडी असणारा पण सरळ उभा कडा त्यामुळे हा कोपऱ्याचा कठीण भाग, मग दीड-दोन मीटर उंचीचा भाग. त्यानंतरच झाड, तेथून सोपी चढण, पण मधमाश्यांच्या असंख्य वसाहती म्हणून मावळतीकडे कललेला हा सुळका चढणं म्हणचे मध्यम साहसच आहे.

सम्राज्ञीपद तुझेच गमत सृष्टिचे
सिंहासन सह्याद्रि खाली गालिचे
अंथरिले हरित-धवल, गवत-वाळुचे!

असं गोमंतकांचे वर्णन इथेही लागू पडते. अरण्यात उगवलेल्या ह्या कातळी सुळक्याच्या माथ्यावरून अवघा परिसर नीट न्याहाळता येतो. पश्चिमेकडे मुंबईची महानगरी त्याअलिकडील घारापुरी दिसते. पूर्वेकडचा माणिकगड लक्ष वेधून घेतो. त्यामागील सह्याद्रिची मुख्य डोंगररांग, त्यातील नागफणी (ड्यूक्स नोज), राजमाचीचे आवळेजावळे डोंगरमाथे, ढाकचा किल्ला सहजच ओळखता येतो. दक्षिणेला सांकशी दुर्ग अन् ईशान्येला असणारी माथेरानची झाडी ओळखायला काहीच अवघड पडत नाही. मलंगगड देखील सहजच दिसतो. आद्य क्रातिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मग्राम शिरडोण इथल्याच तळवटीत आहे.

बारा-तेराव्या शतकात खोदलेली पाण्याची टाकी, सोळाव्या शतकातील नगरच्या निजामशाहीच्या अंमल, शिवशाही, मुघल, आंग्रे, पेशवे अन् सरतेशेवटी १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने जिंकल्यावर सुरू झालेली आंग्लाई, नंतर तिरंग्याच्या साक्षीने मिळालेले स्वातंत्र्य, हया इतिहासाच्या उलगडत जाणाऱ्या कालपटाच्या चित्रात शिवरायांनी हा किल्ला स्वाधीन करून घेताना केलेली गंमत अन् वापरलेली युक्ति मुंबईकर अंग्रेजांनी सुरतेच्या वरिष्ठांना कळवली.

मराठ्यांनी पनवेलपासून डोंगराला प्रथम वेढा घातला. मग

फळ्या व चिखलाच्या भिंती बांधत, त्या आडून हल्ले करीत ते तटाशी पोहोचले.. आणि मग कर्नाळ्यावर त्यांनी ताबा मिळवला. त्याची नोंद मराठी कागदपत्रांत मिळते. 'शके १५९२, साधारण संवत्सर. आषाढ शु. १४ ला कर्नाळा घेतला.'

तर असा हा कर्नाळा. पुण्या-मुंबईच्या भटक्यांना, निसर्ग-निरीक्षकांना, साहसी डोंगरवेड्यांना खुणावणारा कर्नाळा आजतरी सुस्थितीत नाही. दोन-तीनशे से.मी. पाऊस पडणारा भाग असूनही एप्रिल-मे मध्ये इथे पाण्याचे दुर्भिक्ष. इथे येणाऱ्या पर्यटकांच्या तुलनेत अपुरी पडणारी निवासव्यवस्था, त्या मूळच्या उत्तम झोपड्यांतील सर्व सोयींची आजची दयनीय अवस्था आणि मुख्यत: बेताल वागण्याने, कर्कश आरड्या-ओरड्याने, हिडीस वागणुकीने दुर्गप्रेमी-पक्षीनिरीक्षक अन् साहसी पर्यटकांना नको करणारी तरूण टोळक्यांची भाऊगर्दी यामुळे अगदी उबग येतो आणि मग मनी येते - ही स्थळे पाहायला जावे असे आम्ही सांगतो, ते चुकत तर नाही ना?

## ५. किल्ले कांगोरी (मंगळगड), आणि चंद्रगड (ढवळगड) :(जि. रायगड)

महाराष्ट्रात भटकायचे वेड असणाऱ्यांना कुठे भटकायचे याचा प्रश्न कधी पडणारच नाही. महाबळेश्वर म्हणजे महाराष्ट्राचे नंदनवन. ऑर्थर सीट हे गुलहौशी पर्यटकांच आवडते ठिकाण. तिथे उभे राहिले म्हणजे ध्यानी येतो सह्याद्रिचा आक्राळविक्राळ परिसर. थोड्याबहुत जाणकारांना मकरंदगड, राजगड, तोरणा तिथून ओळखू येतात. पण त्याच परिसरात आणखी दोन दुर्गरत्ने विसावली आहेत. त्यांची नावेही मोठी गमतीदार आहेत. एक आहे चंद्रगड

म. ग. के. ग्रंथ, वाचनालय ठाणे.
२८६६
७।-७।-




तर दुसरा आहे मंगळगड.

या चंद्र-मंगळावर जायचे म्हणजे एक सुरेख पायपीट आहे, उद्बोधक अनुभव आहे. पुण्याहून भोरमार्गे वरंधा घाटातून महाड-रायगडकडे जाता येते. वरंधाघाट उतरला की एक छोटेसे गाव लागते. त्याचे नाव माझेरी. माझेरीच्या उत्तरेस आहे श्रीसमर्थ रामदासस्वामींची शिवथर घळ म्हणजे सुंदरमठ. पश्चिमेस आहेत महाडरायगड तर दक्षिणेस आहेत मंगळगड ऊर्फ कांगोरी अन् चंद्रगड ऊर्फ ढवळगड. त्याच्याही दक्षिणेस आहे क्षेत्र महाबळेश्वर.

माझेरीहून ५-५॥ तासांत पिंपळवाडी ह्या कांगोरी किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गावी पोहोचता येते. आता तर महाडहून पिंपळवाडीपर्यंत राज्य परिवहनाची गाडीही दिवसातून दोनदा येते. माझेरी ते पिंपळवाडी या भ्रमंतीत प्रथम तळे व नंतर किये ही गावे लागतात. कांगोरी ऊर्फ मंगळगड हा तसा आडबाजूचा किल्ला. माझेरीजवळच्या वरंधाघाटावर कावळ्या किल्ला पहारा करतो आहे. रायरेश्वरानजीकच्या अस्वलखिंड, कामथा घाटावर कांगोरी नजर ठेवून आहे. तर महाबळेश्वराच्या ढवळाघाटावर चंद्रगडाचा दरारा आहे. हे घाटमार्गही दुय्यम, मग त्यानजीकचे किल्लेही तितपतच असणार हे स्वाभाविकच नव्हे काय !

सह्याद्रिच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या मुख्य रांगेला पूर्व-पश्चिमेकडे फाटे-उपफाटे आहेत. ह्या शाखा-उपशाखांवर काही किल्लेवजा बांधकामे आहेत. कांगोरी ज्या रांगेवर आहे ती रांग पिंपळवाडीकडे उतरत आलेली आहे. एकाच दांडावरची उभी चढण उन्हात चढायची म्हणजे खरोखरीच कसोटी आहे. पण ह्या सोंडेवरून पुढे गेले की, पूर्व दिशेला असणारे गडाचे एकमेव प्रवेशद्वार लागते. आता जवळचे संरक्षक बुरूज, कमानी, देवड्या, दिंड्या काहीही नाही. पण महादरवाजा कुठे असेल हे नेमके उमगतेच. दारातून प्रवेश होतो माचीवर. ह्या माचीवर एक छोटेसे काळभैरवाचे


माझेरी-महाबळेश्वर (कच्चा नकाशा)
शेवत्या घाट
मढे घाट
उपांड्याची नाळ
आंबेनळी घाट
गोप्या घाट
सुपेनाळ
शिवथर गाव
पारमाची
वरंध
शिवथर घळ उर्फ सुंदरमठ
खुट्याची वाट
कावळ्या किल्ला उर्फ मनमोहनगडउर्फ
कासलोडगड
माझेरी
वरंधा घाट
भोर
तळे
चिकणा घाट
किये
पिंपळवाडी
कांगोरी उर्फ मंगळगड
कामथा घाट
कामथे
रायरेश्वर
वडघर
कोळेश्वर
महादेव मुऱ्हा
ढवळे
उमरठ
चंद्रगड उर्फ ढवळगड
पोलादपूर
ढवळ्या घाट
प्र.के.
श्री क्षेत्र महाबळेश्वर

देवालय आहे. यालाच कोणी कोणी कांगोरीदेवी समजतात. माचीची तटबंदी अजूनही खणखणीत आहे. देवालय जरा उंचवट्यावर आहे. तिथे जायला काही पायऱ्या चढून जाव्या लागतात. इथे दोन-तीन शिवपिंड्या, काही भग्न मूर्ती, दीपमाळ, एका भग्न दरवाजाचे अवशेष असे बरेच काही आहे. पूर्वी या माचीवर पाणी असावे. आता मात्र फक्त टाक्यांच्या खुणाच काय त्या दिसतात. पाण्यासाठी धाव घ्यावी लागते ती निवारा नसलेल्या बालेकिल्ल्यावरच. बालेकिल्ल्यास थोडी खालून प्रदक्षिणा घालता येते व त्यावाटे पाण्याची सात-आठ टाकीही आहेत. बालेकिल्ल्यावर किल्लेदाराच्या वाड्याचे व एका इमारतीचे अवशेष दिसतात. भर दुपारी टेकायला डेरेदार वृक्षाखालील सावलीची मात्र वानवाच आहे. बालेकिल्ल्यावर आहेत चार खुरटी झुडपं, पण पाणी मात्र ए वन् हं!

स्वराज्याच्या प्रारंभी शिवाजीमहाराजांचा तंटा झाला जावळीकर मोऱ्यांशी. अखेर जावळी स्वराज्यात आली तेव्हा हे चंद्र-मंगळही स्वराज्यात आले. राजांना गडांची नवी नावे ठेवायचे वेडच होते. तोरण्याचा प्रचंडगड; कोंडाण्याचा सिंहगड, वासोट्याचा व्याघ्रगड अन् रायरीचा रायगड केला. तसा कांगोरीचा झाला मंगळगड अन् ढवळगडाचा झाला चंद्रगड. बिरवाडी हे जवळचे मोठे गाव-पेठच म्हणा ना आणि रायगड काही इथून फारसा लांब नाही. रायगडच्या घेऱ्यात असल्याने ह्याला थोडेफार महत्त्व. रायगडच्या अडीअडचणीला इथली फौजही दौडत असेल. पण रायगड हे राजगृह अन् लिंगाणा हे कारागृह. कांगोरीदेखील जरा कमी महत्त्वाचा व कमी धोकेबाज गुन्हेगारांना डांबण्याचे ठिकाण म्हणून वापरला गेल्याचे आढळते. शिवशाहीतच नव्हे तर अगदी मराठेशाहीच्या अस्तापर्यंत हीच स्थिती होती. सरदार बापू गोखल्यांनी हंटर आणि मॉरिसनसाहेबांना इथे तुरूंगाची हवा दाखविली होती. इ.स.१८१८ साली कर्नल

प्रॉथरचा वरवंटा सह्याद्रिभर फिरला. रायगड, सिंहगड, पुरंदर सारखी नावाजलेली ठिकाणे पडली. मग ह्या मातीच्या ढेकळांचा अन् खड्यासारख्या बारकुल्यांचा काय निभाव लागणार. मंगळगडावर अमंगळ घडलं अन् आंग्लेशाहीचा पट्टेरी झेंडा इथंही रोवला गेला.

गडावरून पूर्वेला दुर्गादेवी, म्हसळा, रायेश्वर, त्याचं नाखिंदा हे पश्चिम टोक, कोळेश्वराचे पठार, महाबळेश्वराचा माथा व मढीमहाल ऊर्फ ऑर्थरसीट असे बरंच काही दिसू शकते.

मंगळगडावरून वडघर खिंडीतून वडघर गावात उतरायला दीड-दोन तास लागतात. तिथून महादेवाच्या मुऱ्ह्यावर जायला देखील फारतर तितकाच वेळ. महादेवाचा मुऱ्हा म्हणजे रायरेश्वरापासून निघालेल्या डोंगररांगेचा सपाटीचा माथा. तिथे पाचपंचवीस घरं, गंगाटाकं अन् थोडंसं बाजूला पश्चिमेला महादेवाचे देऊळ आहे.

महादेवाच्या मुऱ्ह्यावरून ३-३॥ तासांत ढवळे गावात पोहोचता येते. तिथून चंद्रगडावर जाऊन यायला फार तर २-२॥ तास लागतात. पण गवताळ घसरडी अन् मुरमाड निसरडी वाट पाहिली की ग्रामस्थांचे म्हणणे पटू लागते. त्या वाटेवर संत कबीराचा एक दोहा आठवला तो असा-

'डगमगाय तो गिरी परै । निश्चल उतरै पार॥'

मन निश्चल ठेवून ही वाट चढता येते व सहजपणे उतरताही येते. डुक्करसोंडीचा डोंगर उजवीकडे ठेवून वांझ किनाऱ्यातून म्हसोबाखिंडीत पोहोचले की डावीकडे चंद्रगडची चढण एका दांडावरची व खडी आहे. क्वचित कोठे कड्यावर खोबणीही आहेत. गडावर आणखी जरा वर उंचवट्यावर आहे. जननीचे देवालय अन् एका वाड्याचे पडीक अवशेष. त्याआधी आहे श्रीशंभुमहादेवाची पिंडी. तिलाच कोणी ढवळेश्वर महादेव म्हणतात. जवळच्या टाक्यातील पाण्यापेक्षा गडाच्या पार उत्तर टोकावरच्या टाक्यातले पाणी अधिक उत्तम आहे. जवळची टेहाळणीची गुहाही मुद्दाम जाऊन बघण्यासारखी

आहे. आपल्याला जरी सगळे डोंगर सारखे दिसत असले तरी ग्रामस्थांनी दिलेल्या नावांचाही निर्देश इथे करायलाच हवा, बैला, पंचटेंभ, कोळीदुर्ग, कलांवतिणीची काढणी ही ती नावे. शिवाय रायरेश्वर, कोळेश्वर, महाबळेश्वराची पठारं आपल्या परिचयाची आहेतच. सरळ रेषेत महाबळेश्वराची ऑर्थरसीट (मढी महाल) अगदी फारतर तीन कि.मी वर आहे.

हा किल्ला उभारला दौलतराव चंद्रराव मोऱ्यांनी ह्या किल्ल्याचा माथा मात्र अगदी छोटेखानीच आहे. जावळीबरोबरच हा ढवळगडही राजांनी मिळाला. चंद्रगड इतका छोटा आहे की ह्याला किल्ला न म्हणता पहाऱ्यांच्या चौकीचीच उपमा शोभून दिसेल.

ढवळगडावरून ढवळेगावात उतरून ढवळेघाटाने ऑर्थरसीट - विंडो पॉईंट खालच्या निसणीच्या वाटेने वर आले की महाबळेश्वरला पैसे उडवायला आलेली मंडळी अक्षरश: तोंडात बोटेच घालतात. ह्या दुर्गम रानातून आपण वर आलो ह्यावर खरंतर आपलाही विश्वास बसत नाही. ५॥-६ तासांची ही ढवळेगाव ते ऑर्थरसीट वाटचाल थरारक आहे फक्त एका ट्रॅव्हर्सीवर. पण त्याआधीची निख्खळ झाडातली वाट अन् धोकेबाज ट्रॅव्हर्सीनंतर बहिरोबाच्या मूर्तीनजीकच्या मस्त पाण्याची आठवण तिथं पुन: पुन्हा यायचं निमंत्रण देतेच देते.

डोंगर-दऱ्यातून पायगाडीवर स्वार होऊन जायला काहीच वाटत नाही. पण ऑर्थरसीट ते महाबळेश्वर एस.टी.स्टँड ही डांबरी रस्त्यावरची फरफट जीव नकोसा करते, हे मात्र खरं.

## ६. किल्ले कांसा (पद्मदुर्ग) : (जि. रायगड)

जंजिरा किल्ल्याच्या उरावर उभारलेला हा एक जलदुर्ग.

कांसा बेटावर हा उभारला म्हणून कांसा किल्ला, पण पद्मदुर्ग हे शिवरायांनी याला दिलेले नाव. किल्ल्यात पाण्याची व्यवस्था, काही शिवबंदीची घरटी आणि उत्तम बांधकामाची तटबंदी असं पाहण्यासारखं. मुरूडहून जंजिऱ्याला जाणाऱ्या होड्याच पद्मदुर्ग ऊर्फ कांसा किल्ला पाहायला घेऊन जाऊ शकतात, पण त्यासाठी जादा पैसे मोजण्याची तयारी हवी. ते सारे होडीत पाऊल टाकण्याआधी ठरवून घ्यायला हवे. प्रथम कांसा किल्ला पाहून मग जंजिरा पहायला येणे सोयीचे पडते.

तसं पाहिलं तर कांसा किल्ला काय किंवा अन्य कोणताही किल्ला काय! तिथे डोळ्यांनी पाहण्यासारखे काहीच नसते. आपण साऱ्याच किल्ल्याची व्यवस्था वारा - वादळ - ऊन अन् पावसावर सोपविली आहे. त्याचे काम ते इमाने-इतबारे करत आहेत.

फोटो अन् फिल्म काढायला निर्बंध घालण्यापुरते आपले पुरातत्व खाते सक्षम आहे. सगळे जरी नाहीत तरी काही निवडक किल्ले अधिक चांगले जनत करण्यासारखे उपयुक्त काम या खात्याकडून पुढे रेटले जायला हवे. याचा आग्रह ना आपण धरत, ना आपले निवडून गेलेले प्रतिनिधी. अशा आडबाजूच्या किल्ल्यांचा उपयोग मग एकतर प्रात:र्विधीची हक्काची जागा म्हणून केला जातो, नाहीतर समाजकंटकांचे अड्डे म्हणून.

काही काळ हे दुर्दैव पद्मदुर्गाच्याही वाट्याला आलं. पण तेही दिवस गेले. आज मितीला मुरूड-जंजिऱ्यात युगपुरूष राष्ट्रनेत्या शिवप्रभूंचा जयघोष करणेदेखील प्राणावर बेतू शकते. याचा कटू अनुभव माझ्याप्रमाणेच अनेकांनी घेतला आहे. जंजिरा पाहताना ही सिद्दीची अंजिक्य लंका आजही उरात धडकी भरवते. पण या उद्दाम-उन्मत्त परकीय सत्ताधीशावर मात करण्यासाठी जंजिऱ्यापासून अवघ्या काही किलोमीटर्स अंतरावर भर समुद्रात शिवरायांनी पद्मदुर्ग कसा उभारला असेल? उभारताना किती

अडचणी आल्या असतील? काय काय प्रसंग उद्भवले असतील? काही काही ठावकी नाही?

हा किल्ला अतिशय बळकट असायला हवा, हे त्या जाणत्या राजाला उमगलं होतं. पद्मदुर्गच्या तटावर दरदिवशी लाटा आपटतात. तिथले दगडी चिरे झिजून गेले, तरी दोन चिऱ्यांमधील चुना अद्याप शाबूत आहे. हे दुर्गबांधणीतील नवल पाहण्यासाठी का होईना कांसा किल्ल्यावर आपण जाऊन यायला हवे. शिवरायांनी बांधलेला प्रत्येक किल्ला म्हणजे दुर्गबांधणीतला एकेक प्रयोग होता. अलिबागच्या पाणकोटाचे म्हणजे कुलाबा किल्ल्याचे चुनाविरहीत बांधकाम, खांदेरीच्या किल्ल्याभोवती ओतलेली दगडांची रास, सिंधुदुर्गाच्या तटाचा पाया शिशाच्या रसात ओतून भक्कम करणं ही याचीच उदाहरणे नव्हेत का?

आपण किल्ल्यावर जायचे ते चेंज म्हणून. मुक्तपणे बोलायला अन् स्वैराचार करायला ही कल्पना जोवर बदलत नाही, तोपर्यंत कुठले शिवराय अन् कोणते दुर्गबांधणीतील प्रयोग? किल्ल्यांवर जाऊन आल्याची खूण म्हणून घाणेरड्या अक्षरात खडू-कोळसा-विटकर किंवा चक्क ऑईलपेंटचा वापर करून आपली नावे अन् पत्तेसुध्दा लिहून ठेवण्याचा वसा आपण घेतला. त्यातून जे किळसवाणे-विद्रूप दर्शन होते त्याची शरम कोणालाच वाटू नये?

मुंबईचे टोपीकर इंग्रज अन् जंजिरेकर सिद्दी यांच्या अनिर्बंध जलसंपर्कावर नियंत्रण आणण्यासाठी कांसा ऊर्फ पद्मदुर्ग, कुलाबा, खांदेरी अशी दुर्गसाखळीच निर्माण केली. या न बुडणाऱ्या युध्दनौकाच होत्या.

पद्मदुर्गाचा अधिक इतिहास आपल्याला ज्ञात नाही हे आपले दुर्दैव. पण शिवरायांचे स्मरण करून देणारे हे शिवस्थान एवढे तरी ध्यानी ठेवायला हवे.

बाल वाङ्मय विभाग
२८६६ दिनांक २६/११/८३
विषय बा.वा.

# ७. किल्ले खांदेरी आणि उंदेरी ऊर्फ जयदुर्ग : (जि. रायगड)

उभ्या महाराष्ट्राचा 'सह्याद्रि' हा मानदंड. महाराष्ट्राच्या भौगोलिक सामाजिक, आर्थिक इ.च्या जडणघडणीत सह्याद्रिचा वाटा मोठा आहे. सिंधुसागराला समांतर धावणारी मुख्य रांग हा खरा सह्याद्रि. पण त्यालाही पूर्वपश्चिम फाटे फुटले आहेत. सह्याद्रिच्या कण्याला असलेल्या ह्या जणू बरगड्याच! पैकी काही फाटे थेट समुद्रात घुसले आहेत. त्यांची शिखरेच काय ती फक्त वर दिसतात. त्या बैटांपैकी काहींवर किल्ल्यांची उभारणी झाली आहे. अर्नाळा, खांदेरी, उंदेरी, जंजिरा, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग ही त्यांची उदाहरणे. रायगड जिल्ह्याचे (पूर्वीचा कुलाबा जिल्हा) मुख्य ठाणे आहे अलिबाग किंवा श्रीबाग. त्याच्याजवळच 'मुंबई हाय' मध्ये सापडलेल्या तेल व वायूवर संस्करण करणारा भलामोठा प्रकल्प थळवायशेतला आकार घेतो आहे. या थळपासून अगदी जवळ खांदेरी-उंदेरी ही किल्ल्यांची जोडगळी आहे. अन् थळच्या किनाऱ्यावर 'खुबलढा' हा सारं काही गमावून बसलेला अती चिमुकला किनारी किल्ला त्यांना साथ देतो आहे.

### शिवनिर्मित दुर्ग.

शिवरायांनी आपली राजधानी राजगडावरून रायगडी हलवली खरी, पण त्या शिवराज्यात सल होऊन बसलेला किल्ले जंजिरा म्हणजे जंजिरे महरुबा-ही मोठी डोकेदुखी होती. सिद्दीची पीडा साऱ्या मराठी सत्ताधिशांना सतावीत होती. १५६५ ते १६४८ इतका प्रदीर्घ काल हा हबशी येथे राज्य करीत होता. या सिद्दीच्या अन् मुंबईच्या टोपीकर इंग्रजांच्या उरावर 'जंजिरे' बांधण्याचा उपक्रम शिवरायांनी मोठ्या धडाक्याने हाती घेतला. शिवलंका

सिंधुदुर्गाची निर्मिती त्यातूनच झाली. तीच कथा खांदेरीची.

२८ नोव्हेंबर १६७० रोजी जवळजवळ तीन हजार सैनिकांच्या सहाय्याने थळजवळच्या खांदेरी बेटाची पाहणी शिवसैन्याने केली. ही पाहणी जवळजवळ तीन दिवस चालली. किल्ला उभारणी जरी लागलीच झाली नाही, तरी हे बेट ताब्यात राखण्याचे धोरण ठरले गेले. मुंबईच्या इंग्रजांना यातील धोका स्पष्ट जाणवला. त्याबद्दल ते म्हणतात, Khanderi in the hands of Shivaji is a dagger pointed at the heart Bombay (म्हणजे शिवाजीच्या हातात खांदेरी असणे म्हणजेच मुंबईच्या डोक्यावर टांगती तलवारच आहे.) ९ सप्टेंबर १६७१ च्या पत्रात त्यांनी शिवाजीमहाराज खांदेरीवर किल्ला बांधणार असल्याबद्दल आपल्या वरिष्ठांना कळविले होते. २२ एप्रिल १६७२ च्या पत्रात खांदेरी-उंदेरी या बेटांचा हेन्री-केन्री असा उल्लेख केलेला आढळतो.

१४ ऑगस्ट १६७८ म्हणजे भाद्रपद गौरी शके १६०१ रोजी शिवरायांनी खांदेरीवर किल्ल्याचा पाया घातला त्याच्याआधी राजापुरीजवळील कासा बेटावर पद्मदुर्गाचाही पाया घातला तेव्हा इंग्रजांच्या उरात धडकी भरली व त्यांनी या बेटांचा ताबा मिळविण्याचे ठरविले. २७ ऑगस्ट १६७९ रोजी इंग्रजांच्या टेहाळणी नौकेत खांदेरीच्या संरक्षणाची व्यवस्था करणाऱ्या मायनाईकास हे बेट सोडून देण्याचा संदेश पाठविला. त्यावर 'हे बेट आमचे आहे. ते सोडून देण्यास सांगणारे तुम्ही कोण?' असा जबाब मायनाईकाने दिला. अर्थात १५० सशस्त्र सैनिक अन् ४ तोफा यांच्या जोरावर हे उत्तर देता आले. यानंतर थळ ते खांदेरी ही रसदवाट रोखण्यासाठी 'हंटर' ही बोट खांदेरीजवळ ठेवली. शिवाय तीन इतर नौका हंटरच्या दिमतीस देण्यात आल्या होत्या. आणि हे बेट आमच्या (म्हणजे इंग्रजांच्या) मालकीचे आहे व त्यावर शिवाजीने आक्रमण करू नये, त्याचे गंभीर परिणाम होतील'

असा निरोपही पाठविला. पोर्तुगीज राजकन्येशी केलेल्या विवाहात इंग्रजांना मुंबई बेट आंदण दिलं गेलं. तेव्हा आसपासची सारीच बेटं आपली असा गोड गैरसमज त्यांनी करून घेतला होता. अर्थात भारतीय प्रदेश परस्पर कोणी आंदण देणं हाच विनोद होता. या वेळी खांदेरीवर चारशे मराठी माणसे तट रचण्याचे कार्य करीत होती. ७ सप्टेंबर १६७९ रोजी एक मीटर उंचीचा तट उभारून पुरा झाला होता. शिवाय मोक्याच्या ठिकाणी तोफा रोखल्या होत्या. आता मात्र लष्करी हालचालींना वेग आला.

**पहिली चकमक.**

११ सप्टेंबर १६७९ रोजी मायनाईकाच्या सहाय्याला दौलतखान भली मोठी कुमक घेऊन आला. १५ सप्टेंबर १६७९ रोजी रिव्हेंज, हंटर आदि जहाजे घेऊन केग्विन हा नामांकित नौसेनाधिकारी चालून आला. मोठी चकमक झाली अन् इंग्रजांचा त्यात साफ पराभव झाला. दौलतखान आपली वीस जहाजे घेऊन नागावला परतला. काही इंग्रज नौका मात्र खांदेरीभोवतीच घुटमळत राहिल्या.

**दुसरी झुंज.**

१८ ऑक्टोबर रोजी ४०-५० मराठी गलबते नागावखाडीतून इंग्रज सैन्यावर चालून गेली. थळच्या किनाऱ्यावर केग्विनने रिव्हेंजमधून चांगली लढत दिली. अखेरीस ५-७ गलबते व प्रचंड लूट मराठ्यांना मिळाली. चिडीला आलेल्या केग्विनने १९ ते २३ ऑक्टोबर लहामोठ्या चकमकी चालूच ठेवून पोर्तुगीज सिद्दीचे सहाय्य घेण्याचे ठरवून तशी बोलणी त्यांच्याशी सुरू केली.

**तिसरा लढा.**

१७ नोव्हेंबर १६७९ ह्या दिवशी या युद्धाचे अखेरचे पर्व

लढले गेले. मराठी आरमाराच्या अर्धचंद्राकृती व्यूहात इंग्रजांचे 'डोव्ह' हे गलबत सापडले. इंग्रज आरमाराचा पुरा फजितवाडा झाला. वीस युरेपियन आणि कैक देशी माणसे युध्दकैदी म्हणून हाती लागली.

अखेरीस २४ डिसेंबर १६७९ रोजी इंग्रजांनी शिवरायांचे प्रभुत्त्व मान्य केले व १६ जानेवारी १६८० रोजी चौलचा मराठी सुभेदार अण्णाजी याच्याबरोबर तहनाम्यावर सह्या झाल्या.

१६७९-८० मध्ये सिद्दीने खांदेरी युध्दासाठी इंग्रजांना मदतीचा हात पुढे केला आणि पहिला डाव म्हणून सिद्दी कासमने खांदेरीवर लढाई करता करता खांदेरी व थळ दरम्यानच्या उंदेरी बेटाचा ताबा घेतला व तेथे किल्ला बांधला. सप्टेंबर १६८१ मध्ये म्हणजे संभाजीराजांनी महाडच्या दादाजी रघुनाथ प्रभु देशपांडे याला उंदेरीवर पाठवले. यश मिळाल्यास अष्टप्रधानात जागा देण्याची तयारी दाखवली. दुर्दैवाने रायगडावरील ४००० सैन्य नागोठाणा बंदरातील २२ गलबते व त्यांवरील सैन्य हे सारे अपुरे पडले. दादाजी देशपांड्यांचा पराभव तर झालाच, पण सिद्दीच्या सैन्याने महाडपर्यंत पाठलाग करून घरदार लुटले व त्यांची बायकामाणसेही पळवली.

पुढे चौलचा बजाजी पिलाजी तबीब याने संभाजी राजांना उंदेरी घेऊन द्यायचे कबूल केले. मायनाईक भंडारीच्या मदतीने उंदेरीच्या तटास शिड्या देखील लावल्या. पण उंदेरीचा किल्लेदार सावध झाला. त्याने बजाजीचा पराभव तर केलाच, पण त्यालाच बायकामुलांसह बाटविले.

यापुढेही अनेक चकमकी झाल्या, पण खांदेरीनजीकचा हा दुर्ग काही मराठ्यांना घेता आला नाही. २६ मे १७३३ रोजी अंबाजीपंत पुरंदऱ्यांना बाजीराव पेशवे कळवतात, ''सिद्दीचे दोन हात जबरदस्त आहेत. एक अंजनवेल व एक उंदेरी. त्यास

प्रतिनिधी अंजनवेली जातील तरी उत्तम आहे. सरखेल उंदेरीस खटपट करतील - ते दोनी स्थळे दातास आलियावर याची हिंमत कमी होईल व आसराही तुटेल -'' अखेरीस १७६० च्या जानेवारीत पेशव्यांचा आरमार सुभा नारो त्रिंबकने उंदेरी किल्ला सर केला व त्याचे नाव ठेवले जयदुर्ग.!

१७५५ च्या तहात इंग्रजांना खांदेरीचा ताबा दिला, पण तो कागदोपत्रीच राहिला. प्रत्यक्ष ताबा १७७५ च्या सुरतेच्या तहानंतर मिळाला. पण १७८७ च्या पुरंदरच्या तहान्वये हा फिरून राघोजी आंग्ऱ्यांनी मराठ्यांच्या नियंत्रणाखाली आणला. आंग्ऱ्यांच्या घरातील कटकटी, १७९९ मध्ये जयसिंग आंग्रे यांच्या सुटकेच्या बदल्यात, त्यांची पत्नी सकवारबाई हिने दौलतराव शिंदे यांना खांदेरी किल्ला देण्याचे कबूल केले. खांदेरीचा ताबा मिळाल्यावर जयसिंग आंग्ऱ्यांस शिंद्यांनी ठार मारले व सकवारबाईसही कैदेत टाकले. पुढे १७९९ मध्ये बाबुराव आंग्रे गादीवर आला व दुसऱ्या बाजीरावाने पाडुरंगपंत कोल्हाटकरातर्फे खांदेरी-उंदेरीचा ताबा घेतला. ते साल १८१४ होते. १८१७ मध्ये आंग्ऱ्यांना पैशांच्या बदल्या पुन्हा खांदेरी-उंदेरी मिळाला. अखेरीस इतर किल्ल्यांप्रमाणे १८१८ मध्ये खांदेरी-उंदेरी, थळचा खूबलढा या साऱ्यांचा ताबा इंग्रजांना कायमचा मिळाला.

**खांदेरीचे दीपगृह.**

खांदेरी-उंदेरी हा सारा परिसर अतिशय खडकाळ आहे. बोटींना धोक्याचा इशारा मिळावा म्हणून पंचवीस मीटर (पंचाहत्तर फूट) उंचीचे षटकोनी दीपगृह १८६७ मध्ये बांधले. कॅटॅडायोप्टेरिक तऱ्हेचा स्वच्छ पांढरा प्रकाश त्यातून २२५ डिग्रीतून दिसू शकतो. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या डेप्युटी कॉन्झर्व्हेटरकडून खांदेरी-उंदेरी किल्ल्यांवर जाण्यासाठी लेखी परवानगी मिळवणे

आवश्यक ठरते. तशी परवानगी नसेल तर तेथे जाता येत नाही. त्याचप्रमाणे येथे फोटो काढण्यास पूर्ण बंदी आहे. फोटो काढल्यास मोठी शिक्षा होते. या खांदेरीच्या दीपगृहाचा उजे़ड जवळजवळ चाळीस किलोमीटर दूरपर्यंत दिसू शकतो.

**खांदेरी-उंदेरीवर कसे जावे.**

डेप्युटी कॉन्झर्व्हेटर, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट हेड ऑफिस बिल्डिंग, शूरजी वल्लभदास मार्ग, मुंबई ४०००३८ यांचेकडून लेखी परवानगी मिळवली की श्री.घनशाम कुलपे, थळ यांना पत्र टाकून होडीवाल्याचे पक्के करावे. किंवा थळच्या व्ही.जी. रानडे हायस्कूलच्या श्री. सुधीर म्हात्रे या शिक्षकांशी संपर्क साधावा ते होडी मिळवून देण्यास मदत करू शकतील. होडीवाल्याला जाण्यायेण्याचे पैसे आधी ठरवावेत व मगच जावे. किल्ल्यात जाताना भरती-ओहोटीच्या वेळाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**दुर्ग खांदेरी दर्शन.**

खांदेरी बेटावर दोन टेकड्या आहेत. डावीकडील म्हणजे दक्षिणेकडील टेकडी जवळजवळ तीस मीटर उंच आहे. त्यावर दीपगृह आहे. तर उजवीकडची म्हणजे उत्तरेकडची टेकडी वीस मीटर उंच आहे. यावरच धक्क्याच्या जवळ श्री.वेताळाचे मंदिर आहे. देवळात एक मोठी त्रिकोणी वेडीवाकडी शिळा आहे. तोच वेताळ. या रहाळात कोणीही नवी होडी, गलबत, ट्रॉलर घेतला की नवस फेडण्यास ते वेताळाच्या दर्शनास येतात व बकरा बळी देतात. दीपगृहाच्या टेकडीवर दौदपीराचे ठाणे आहे. त्या वाटेवर एका दगडावर आघात केल्यास भांडे वाजल्याचा आवाज/मेटॅलिक साउंड यावा तसा येतो. गडावर अलीकडेच गणेश हनुमान यांची मंदिरे, बौध्द मंदिर, खिरस्त्यांसाठी क्रूस

आदि उभारले आहे. याशिवाय गडावर महादेवाचे प्राचीन मंदिरही आहे. गडाचे बहुतेक बुरुज अजूनही शाबूत आहेत. एकावर तर तोफाही शिल्लक आहेत. गडावर गोड्या पाण्याची विहीर आहे. तेथून पाणी पंप करुन वर दीपगृहात नळाने नेले आहे. गडाला पूर्वी प्रवेशद्वार असावे. आजमात्र त्याचे अवशेष दिसत नाहीत. ती जागाही नेमकी कोणास माहित नाही.

**किल्ले उंदेरी दर्शन.**

मोठ्या होड्या काही उंदेरीजवळ जात नाहीत, पण छोट्या होड्यांनी जाता येते. उंदेरीवरील जागा खाजगी मालकीच्या आहेत. बहुतेक मालक थळचे आहेत. उंदेरी किल्ल्यावरही दोन उंचवटे आहेत. तटबंदी अजून शाबूत आहे, पण वावर नसल्याने गडावर झाडी माजली आहे. पाण्याची ठिकाणे शोधूनही सापडत नाहीत. उंदेरीच्या ईशान्येस नावा नांगरता येतात. तेथेच एक कोरीव लेणेही आहे. येथील तळघरात कैदी ठेवीत असत.

**खूबलढा किल्ला.**

थळच्या किनाऱ्यावरचा हा चिमुकला उंचवटा म्हणजे किल्ला आहे हेच लोकांना माहित नाही. आतली सपाटी नीटनेटकी करून सारवून काढली आहे. मासे वाळवण्यासाठी त्याचा उपयोग होतो. किल्ल्यात पाण्याचा साठाही नसावा. एक पहाऱ्याची चौकी एवढाच याचा उपयोग होत असावा.

## ८. किल्ले खेडदुर्ग (सागरगड) : (जि. रायगड)

रायगड जिल्ह्याचा तोंडवळा बदलणाऱ्या व बऱ्याच गाजलेल्या

थळ-वायशेत खतप्रकल्पाच्या अगदी जवळ म्हणजे मुंबईच्या दक्षिणेस अवघ्या ३० कि.मी. वर अलिबागच्या पूर्वेस १० कि.मी. वर आणि धरमतरच्या पश्चिमेस १० कि.मी. वर दाट वृक्षराजीचा बुरखा घेऊन दडलेला किल्ला म्हणजे सागरगड. ह्यालाच खेडदुर्ग म्हणूनही ओळखतात.

इ.स. १६६५ मध्ये शिवरायांना जयसिंगाच्या स्वारीत नमते घेऊन मोगलांच्या हवाली २३ किल्ले करावे लागले. ह्या 'पुरंदरच्या तहात' सागरगडचा समावेश मोगलांकडे दिलेल्या २३ किल्ल्यांत होता.

सागरगडाच्या टेकड्या अलिबाग तालुक्याच्या साधारणतः मध्यावर आहेत. ४०० मीटर उंचीच्या माथ्याच्या टेकडीवरचा हा किल्ला ३ कि.मी. लांब व एक कि.मी. रूंद आहे. चहूअंगाला दाट आंबराया, बरीचशी काजू व सागाची झाडे यांमुळे हिरव्यागार झाडीतून जाताना ऐन उन्हाळ्यातदेखील त्रास होत नाही. अलिबागहून पूर्वेच्या मार्गाने म्हणजेच धरमतरहून आंबेपूरमार्गे किंवा पोयनाडहून वाघोलीमार्गे सागरगडावर जाता येते किंवा अलिबागहून पश्चिमेकडील मार्गाने म्हणजे अलिबागहून धरमतरकडे जाताना खंडाळा गावातून जाता येते. याशिवाय आंदरजोड खिंडीतून म्हणजे नैऋत्येकडून व वडवली गावातून म्हणजे अग्नेयेकडून गडावर जाता येते.

अलिबाग ते खंडाळा हा प्रवास एस.टी.ने करता येतो. तेथून वर चढू लागले म्हणजे गडाच्या नैऋत्य बाजूस असणारी एक मोठी गुहा उजव्या हातास दिसते. सप्तर्षींचे जागृत स्थान येथे आहे, असे म्हणतात. येथे पांडवांनी काही दिवस वास्तव्य केले होते असे मानतात. ३२ मीटर लांब, १२ मीटर खोल व ४ मीटर उंच अशी ही गुहा आहे. जवळच आदमासे १०० मीटर उंचीचा अरुंद धबधबा आहे. भाद्रपद-अश्विनात त्या ठिकाणचे अवर्णनीय सौंदर्य पर्यटकांना खरोखरच भुरळ पाडील. याच्या

जवळच जरा वरच्या बाजूस बऱ्या बांधणीचे एक मंदिर आहे. त्याच्या सभामंडपात मुक्काम करावयास चांगली जागा आहे. हा धबधबा ·धोंडाणे धबधबा म्हणून ओळखला जातो. यापुढचा टप्पा चढाचा असून तो आंबा व सागाच्या झाडीतून गेला आहे. १।।-२ कि.मी. चालले म्हणजे किल्ल्याचा उत्तराभिमुख दरवाजा येतो. त्याच्या दोन्ही बाजूस भक्कम बांधणीचे बुरूज आहेत. दरवाजाच्या बांधणीत लाल व काळे दगड वापरल्याचे दिसते. मात्र येथे खूप पडझड झालेली आहे. आत जाताच देवड्या व पाण्याचा हौद (जरा बाजूला) आहेत. गडाचे दक्षिण टोक म्हणजे एका सुटावलेला सुळका असून त्यास वानरटोक म्हणतात. येथे डाव्या हातास 'सतीचा माळ' म्हणून ओळखली जाणारी जागा आहे. जंजीरनदी, धरमतरची खाडी व पूल, भातशेती, नागोठणा खाडी, करंजा बेट, माथेरानचे पठार, प्रबळगड हा सारा देखावा येथून दिसतो. शिवाय पश्चिमेकडे चौलची खाडी, रोह्याची खाडी, जंजिऱ्याजवळील टेकड्या, सिंधुसागर, कनकेश्वरचा डोंगर असा बराच परिसर दृष्टीपथात येथूनच येतो.

किल्ल्यातील उंचवट्याला ४ मीटर उंचीच्या व ५ बुरूजांनी युक्त अशा तटबंदीने अधिक संरक्षक व बंदिस्त रूप देऊन बुलंद बालेकिल्ला बनविला आहे. ८० मीटर लांबी ही दक्षिणोत्तर आहे, तर ४० मीटर पूर्वपश्चिम रुंदी आहे. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस एक गोलाकार तळे आहे. पण आता त्यात खूप गाळ साठला आहे. त्या तलावाजवळच एक छोटेसे मंदिर व दिपमाळा आहेत. जवळची दुसरी इमारत म्हणजे दारूकोठार असावे.

इ.स. १८१८ मध्ये महाराष्ट्रातील सर्व किल्ले इंग्रजांनी जिंकून घेतले. बरेच इंग्लिश अशा किल्ल्यांवर जाऊन आले. काही जणांना त्यांपैकी काही किल्ले अतिशय आवडले म्हणून त्यावर हवा खायची जागा म्हणून त्यांनी आपली विश्रामधामे बांधली, सागरगडावर

जनरल फुलर, श्री. ले. स्टॉक रीड-मुंबई सिव्हील सर्व्हिसमधील एक अधिकारी अशांनी विश्रामधामे बांधली. आता त्यांचे पायेच काय ते आढळतात.

वानरटोकाजवळील सतीच्या माळावर नऊ थडग्यांचा समूह, सतीशिळा, पादुका इ. अवशेष आहेत. गडावर पश्चिमेस गणपती आणि मुंजाबा, नैऋत्येस खेरजाबाई आणि वेताळ अशी स्थाने आहेत. तसेच गडावर एक देवी महिषासुरमर्दिनीची मूर्तीही आहे. गडाच्या नैऋत्येस असणाऱ्या गुहेत दरवर्षी चैत्री पौर्णिमेस यात्रा भरते. तेथून सिंधुसागर व त्यात असणारे खांदेरी-उंदेरी हे किल्ले व्यवस्थित दिसू शकतात.

इ.स. १७१३ साली बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनी कोकणातले १६ किल्ले आंग्र्यांकडे राखून कान्होजी आंग्रे व छत्रपती शाहूमहाराज यांचे सख्य घडवून आणले होते. त्या सोळा किल्ल्यांत सागरगड ऊर्फ खेडदुर्गाचा समावेश होता. पुढे कान्होजी आंग्रे मराठी राज्याचे दर्यासारंग बनले.

थळ-वायशेत हा आता चांगला गजबजलेला भाग होणार आहे. रेक्स-रेड्डी हा सागरी महामार्ग, कोकणरेल्वे अशा अनेक गोष्टींमुळे ह्या भागात अनेक ठिकाणचे लोक येणार. त्यांना चार क्षण निवांतपणे काढण्यासाठी आतापासूनच काही केन्द्रे विकसित करायला हवीत. अलिबागचा कुलाबा किल्ला, खांदेरी-उंदेरी हे आवळे जावळे जंजिरे, जंजिरा मुरूड, चौल-रेवदंडा, कनकेश्वर, सागरगड ही ठिकाणे तिथला निसर्ग, त्या रहाळातली माणसे व त्यांचे लोकजीवन यांचा तोल ढळणार नाही, त्यात उलथापलथ होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अशा ठिकाणांची माहिती पुस्तके, व्ह्यूकार्डस, स्लाइडस् इ. गोष्टी लोकांना सहज उपलब्ध व्हायला हव्यात आणि हे सारे करताना झाडी भरले रुंद रस्तेही निर्माण करायला हवेत.

# ९. किल्ले चंदेरी : (जि. रायगड)

मुंबई-पुणे लोहमार्गावरील बदलापूर-वांगणी स्थानकांचे दरम्यान गोरेगाव आहे. मुंबईहून पुण्याकडे येताना उजवीकडे एक डोंगररेषा आहे. त्यातून आपला भलाथोरला माथा उंचावलेला एक प्रचंड सुळका दिसतो. त्याचे नाव चंदेरी. नाखिंदा, चंदेरी, म्हसमाळ, नवरी बोयी ह्या डोंगररेषेत तटबंदीचे पागोटे लेऊन शिवराज्याची सेवाचाकरी करण्याचे भाग्य ह्या कातळमाथ्याला लाभले. चंदेरी, खांदेरी, उंदेरी, सोनेरी ही काही बलिवंत दुर्गांची नावे वाटत नाहीत, तर गोठ्यातल्या लाडक्या गाई-गुजींचीच नावे वाटतात.

पनवेलच्या प्रभामंडळाचे मानकरी आहेत. कर्नाळा, प्रबळगड, विशाळगड माणिकगड, चंदेरी, पेब आणि असेच कितीतरी. पैकी कर्नाळ्याचे भाग्य अलीकडेच उदयाला आले आहे ते तिथे केलेल्या पक्षी अभयारण्यामुळे. पण त्याचे हे सखेसवंगडी अजून तितकेच उपेक्षित राहिले आहेत. गिर्यारोहकांना कर्नाळ्याचे आकर्षण आहे, ते त्याच्या बेलाग सुळक्यामुळे आणि कातकऱ्यांना आहे ते त्याच्यावरील विपुल मधामुळे.

पण ते सारे सारे या इथे चंदेरीजवळ तर आहेच, पण त्याचा तो बुलंद, गवताळ घसरडा अन् मुरमाड निसरडा कातळमाथा म्हणजे सह्याद्रितील एक बेजोड आव्हान आहे. जितके समर्थ तितकेच अप्रसिध्द !

पुण्या-मुंबईकडे सारे गिर्यारोहक आणि प्रस्तरारोहण कलेची खास आवड असलेले इकडे वाट वाकडी करतातच. पनवेल तालुक्यातील ७०० मीटर उंचीचा हा इटुकला किल्ला खरे तर रायगड जिल्ह्याचे दुर्गभूषण आहे. साधारणत: पेबमाथेरान आणि कल्याणनजीकच्या हाजीमलंग, (खरे तर मलंगगड) यांच्यामधील हा किल्ला इतरांना माहिती नाही. तसे नाव घेण्याजोगे इथे काही

घडलेही नाही.

तसे बघितले तर ह्या किल्ल्याचा समावेश पनवेल तालुक्यातल्या तामसई गावच्या हद्दीत होतो. पण या किल्ल्यावर जायला कर्जत-मुंबई मार्गावरचे वांगणी लोकल स्थानक सोयीचे. तिथे उतरून रेल्वे रुळाच्या कडेकडेने गोरेगाव या गावापर्यंत येऊन डावीकडील पायवाटेने चिंचोली गावी यावे. तेथून २॥-३ तासांत पायवाटेने गडाच्या कातळमाथ्याखालील गुहेत पोहोचता येते. या गुहेत जाणारी वाट मुरमाड घसरडी आहे. गुहेच्या अलीकडे ह्या लष्करी चौकीवजा असणाऱ्या किल्ल्याची अतिअल्प शेष तटबंदी दिसते. किल्लेपणाची हीच काय ती एकमेव खूण. किल्ला म्हटले म्हणजे तट, बुरुज, दरवाजे, दिंड्या खंदक माऱ्याच्या जागा असे बरेच डोळ्यांपुढे येते. पण इथे ते काहीही नाही. या गुहेत एक शिवलिंग व नंदी होता. आता शिवपिंडी भंगली आहे व नंदी कोणा दुष्टाने पळवला आहे. गुहेजवळच अलिकडे डाव्या हातास एक सुमधुर पाण्याचे टाके आहे. रात्रीच्या मुक्कामास गुहा उत्तम आहे. आसपास जळणही मिळते.

गुहा डावीकडे ठेवून एक ट्रॅव्हर्सी सुळक्याच्या पायथ्याशी घेऊन जाते. तेथेही एक टाके आहे. ही सर्व वाट मुरमाड घसरडी अन् गवताळ निसरडी आहे. येथून वर चढायचे तर वाघाचेच काळीज हवे. इथे-तिथे कुठेतरी चार पावट्या खोदलेल्या आढळतात. पण वाट अशी ती नाहीच. मुरमाचे छोटे छोटे खडे अगदी बॉलबेअरिंग्ज बनतात आणि अनवाणी जावे तर कातळकड्यावर पाय भाजून निघतात. ते चटकेही असह्य होतात.

कातळकड्याच्या थोडे अलिकडे एक गुहावजा टाके आहे, ते उजव्या हातास. हे धरून तीन टाकी गडावर आहेत. कातळमाथ्याचा विस्तार फक्त लांबीपुरताच आहे. रुंदी जवळजवळ नाहीच. अल्प पाणी, स्वल्प विस्तार, बांधकामांचा अभाव, अतिशय अवघड

वाट- हे सारं सारं पाहिलं म्हणजे हा किल्ला हा, किल्ला नसून एक लष्करी चौकी असावी असे वाटते. पण येथील गुहा व खोदीव टाक्यांची रचना हे काम फार फार प्राचीन असल्याचे सूचित करतात. दरड कोसळल्यामुळे चंदेरी सुळक्याचा माथा गाठणे आता फारच कठीण झाले आहे. तिकडे जाण्याची वाट आता जाण्याजोगी राहिलेली नाही.

हा बेलाग सुळका चढून वर गेले म्हणजे उगवतीकडे लेंडी अन् गाढे नदी, त्यांच्या संगमातून पुढे गेले की काळुंद्री नदी, म्हसमाळ, बोई, टोपले, निमढा ही गिरीशिखरे, माथेरान, प्रबळची डोंगर रांग, त्या अलिकडचा कोनडले हा पाझर तलाव हे सर्व दिसते. तर मावळतीच्या बाजूला भीमाशंकरचे पठार, सिंधगड, गोरक्षगड, कोतळीगड ऊर्फ पेठचा किल्ला, कर्नाळा, विशाळगड, हाजीमलंग, असे अनेक दुर्ग दिसतात.

या व अशा बेवसाऊ किल्ल्यावर जाण्यात काय सुख असते? असेच बरेच जण विचारतात. पण त्या बेलाग 'सुळक्यावर चढताना असणारा धोका पत्करुन देखील ते थ्रिल' एकदा तरी अनुभवलेच पाहिजे. तिथे असणारी नीरव शांतता तिथे भासणारा एकाकीपणा अंतर्मुख करतो आणि अशी चार ठिकाणे पाहिल्यावर स्वभावात फरकही पडतो. दुसऱ्याला मदत करणे, चार-चौघांना संभाळून नेणे, पाण्यावाचून राहणे, आहे त्यात भागवून नेणे अशा कितीतरी गोष्टी नकळत अंगवळणी पडतात.

जनसामान्यांपासून लांब असणाऱ्या ठिकाणी जाताना रंगीबेरंगी रानफुले, पक्षी, फुलपाखरे यांच्या अभ्यासाची गोडी निर्माण होते. पुराणपुरूष सह्याद्रिच्या पाषाणहृदयातले स्फटिकमणी लक्ष वेधून घेतात. आपल्या भूगोलाला ज्यांनी इतिहास दिला ती ठिकाणे पाहता येतात. आकाशीच्या लक्ष लक्ष चांदण्यांच्या पहाऱ्यात, एखाद्या अनगड गुहेत किंवा सुघड मंदिरात लागलेली झोप सुखवून जाते.

काही जाणकरांच्या मते ७ ऑक्टोबर १९५७ रोजी चंदेरी किल्ल्याच्या सुळक्यावर संघटित प्रस्तरारोहण केले गेले व तेथेच महाराष्ट्रातील प्रस्तरारोहणाचा आरंभ झाला. हा दिवस गिर्यारोहण दिवस म्हणून साजरा व्हावा असेही मत मांडले जाते. (संदर्भ- 'जिद्द', वर्ष पाचवे, अंक तिसरा.)

## १०. किल्ले जंजिरा : (जि. रायगड)

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट. राजपुरीच्या खाडीत ऐन तोंडावर एक बेट होतं. उसळणाऱ्या दर्यात होड्या लोटून मासेमारी करणाऱ्या कोळ्यांनी लुटारू चाच्यांपासून संरक्षण करण्यासाठी राजपुरीच्या शाही ठाणेदाराची परवानगी मागून त्या बेटावर एक मेढेकोट उभारला. मेढेकोट म्हणजे मोठमोठे ओंडके जमिनीत एकापुढे एक रोवून बंदिस्त केलेली जागा. राम पाटील हा त्या कोळ्यांचा म्होरक्या. त्या स्थानाचे महत्त्व कालांतराने त्याच्या ध्यानी आले. अन् त्याने राजपुरीच्या ठाणेदारालाच तिथे यायला प्रतिबंध केला. त्या कर्तव्यनिष्ठ सुभेदाराने बादशहाला कळवले.

निजामशहाने हा गुंता सोडवायला पिरमखान नावाच्या धूर्त सरदाराची नेमणूक केली. त्याने सर्व स्थिती न्याहाळली अन् शक्तीचा उपयोग होणार नाही हे जाणले.

एकेदिवशी राम पाटलाकडे सांगावा गेला-एक दारूचा व्यापारी त्याची भेट घेऊ इच्छितो. साध्याभोळ्या राम पाटलाने त्याच उत्तम आगतस्वागत केले. खूष होऊन त्या दारूच्या व्यापाऱ्याने राम पाटलाला अन् त्याच्या लोकांना उंची दारूच्या बाटल्या नजर केल्या. हा स्नेह वाढतच राहिला. एकेदिवशी त्या व्यापाऱ्याने आपल्या लोकांची हा मेढेकोट पाहण्याची इच्छा व्यक्त केली.

राम पाटलाने ती मान्य केली. दिवस कलला अन् ती गलबतं मेढेकोटास आणून लावली गेली. रात्री राम पाटील आणि मंडळींनी यथेच्छ मदिरापान केले अन् ती त्या नशेत बेहोष होऊन गेली. आता पिरमखानाने आपले खरे स्वरूप उघडे केले. सारी मंडळी कापून काढली आणि मेढेकोटावर ताबा मिळवला.

पिरमखानाच्या मृत्यूनंतर त्या जागी बुऱ्हाणखान आला. हा मूळचा ॲबिसिनीयातला. हबशी! काळाकभिन्न, दणकट प्रकृतीचा अन् डोकेबाज. त्याने बादशहाची परवानगी मिळवली. इ. स. १५६७ ते १५७१ या कालखंडात त्याने एक बुलंद जलदुर्ग आकारास आणला. त्याचे नामकरण केले-'जझीरे मेहरुब.' जंजीरा हा शब्द आला आहे. जंझीरा या अरबी शब्दावरून. त्याचा अर्थ बेट. अन् मेहरुब म्हणजे चंद्रकोर.

इ. स. १६१७ मध्ये सिद्दी अंबर, बादशहाकडून स्वतंत्र जहागिरीची सनद घेऊन आला. जंजिऱ्याच्या सिद्दी घराण्याचा हा मूळपुरूष.

पुढे जुन्नर प्रांती महाराष्ट्राचा स्वांतत्र्यसूर्य उगवला. १६५६ पर्यंत पुरंदराभोवती वावरणाऱ्या शिवबाने जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा पाडाव केला. राज्यकक्षा रूंदावली. रायरी, भोरप्या, वासोट्यासारखी बुलंद ठाणी स्वराज्यात मोडू लागली. १६५७ च्या जुलैत रघुनाथ बल्लाळ सबनीस अन् निळोपंताची रवानगी जंजिऱ्याकडे झाली. दंडा राजपुरीपर्यंत धडक: बसली. पण सिद्दी जंजिऱ्यात सुखरुप राहिला अन् ही पहिली मोहीम अपयशी झाली. राजे खट्टू झाले.

पण निराशा माहीत नसलेल्या राजाने पुन्हा १६५९ मध्ये खुद्द पेशव्यांना म्हणजे शामराव नीळकठांना जंजिऱ्यावर पाठवले. सिद्दीने भ्यायल्याचं सोंग आणले. पेशवे स्वत: जातीने तहाची बोलणी करण्यासाठी जंजिऱ्यात दाखल झाले.

आणि शामराव नीळकंठांना सिद्दीने विश्वासघाताने कैद केले. 'पुन्हा वाटेस जाणार नाही,' या अपमानास्पद अटीवर त्यांची सुटकाही झाली. पण ती गोष्ट शिवाजी महाराजांच्या मनाला लागून राहिली. त्यांनी नरहरी आनंदरावांची पेशवेपदी नेमणूक केली. अन् वर्षभरात मोरोपंतांची नेमणूक पेशवे पदावर झाली.

१६६९ मध्ये खुद्द मोरोपंत पेशवे दंडा रागपुरीपावेतो आले. तळेगड, घोसाळगडही ताब्यात आले. जंजिऱ्याच्या वायव्येस अवघ्या ३ कि.मी. वरील एका खडकाळ बेटावर (त्याचं नाव कांसा) एक जलदुर्ग उभारला अन् नाव ठेवले पद्मदुर्ग! सर्व बाजूंनी सिद्दीची नाकेबंदी झाली. सिद्दी पुरा कोंडला गेला. सिद्दी फत्तेखानाने बिनशर्त शरणागती पत्करायचे ठरवले. इतकी वर्षे हुलकावणी दिलेला हा बलदंड किल्ला स्वराज्यात सामील होणार.....इतक्यात.....सिद्दी संबूळ-सिद्दी कासीम व सिद्दी खैर्यत यांनी सिद्दी फत्तेखानालाच कैदेत टाकले. दिल्लीपती औरंगजेबाचे स्वामित्त्व मान्य करून त्याची मदत मागवली अन् हे एक स्वप्न हवेत विरलं.

१६७२ ची गोष्ट. मार्च महिन्यातले दिवस. होळी-पौर्णिमेच्या रात्री पद्मदुर्गावरचे सारे सैनिक दारू पिऊन बेहोष झाले होते. सिद्दीने डाव साधला. पद्मदुर्गदेखील सिद्दीच्या ताब्यात गेला.

'दंडा राजपुरी येथील हबशी घरातील उंदीर जैसा-तैसा!' महाराजांच्या मनी हे शल्य डाचत राहिले. १६७५ साली मोरोपंतांनी पुन्हा एकदा जंजिऱ्यावर मोर्चा वळवला. ऑगस्ट महिन्यातले वादळी दिवस. काळीकुट्ट रात्र. उफाळलेला दर्या नेहमीप्रमाणे जंजिऱ्याच्या तटबंदीशी धडका घेत होता. त्या भयाण रात्री चार-दोन होड्या जंजिऱ्याच्या तटाला भिडल्या. बरोबरच्या शिड्या तटाला लावल्या. आता फक्त आणखी जवान येणार होते. तटाला लावलेल्या शिड्यांवरुन वर जाणार होते. मग एक तुंबळ युध्द होणार होतं. अन् स्वराज्याच्या

कुशीला सलणारा सिद्दीचा काटा नाहीसा होणार होता.

पण.....

मोरोपंतांची माणसे तिथवर येऊच शकली नाहीत. असं का झालं, हे मात्र कधीच कळले नाही. प्रहर-दोन प्रहर वाट पाहून त्या होड्या अन् शिड्या परत किनाऱ्यावर आल्या. अलिबागच्या (खरं तर श्रीबागच्या) लाय पाटलानं केलेले श्रम वाया गेले. धाडस वृथा ठरलं.

महाराजांना ती बातमी कळली. त्यांनी लाय पाटलाचं कौतुक केलं. पालखीचा मान दिला. लाय पाटलानं तोही नाकारला. मग राजांनी एक उत्तम होडी बांधून घेतली. होडीला नाव दिलं 'पालखी!' पण जंजिरा सिद्दीकडेच राहिला!!

१६७८ च्या जुलैत पुन्हा एकदा जंजिऱ्यावर स्वारी झाली. दक्षिण दिग्विजय यशस्वी झाला होता. राजे सिंहासनाधिष्ठित झाले होते. बळही वाढलं होतं. आरमार आकाराला आले होते. सिंधुदुर्गासारख्या शिवलंकेने त्याची शोभाही वाढली होती. पण हा जंजिरा! तेथे हरप्रयत्ने उपाय करूनदेखील हात टेकावे लागत होते. १६७८ च्या या स्वारीत खुद्द राजे जातीने सामील झाले होते. पण सिद्दी कासीम गलबतातून मुंबईस पळाला. तेथून पोर्तुगीजांची मदत मिळवून राजांच्या प्रयत्नावर पाणी पडले. सिद्दी जंजीऱ्यात सुरक्षित राहिला. १६७८ च्या डिसेंबरात याचीच पुनरावृत्ती झाली.

दुर्गपती शिवरायांनंतर संभाजी राजे गादीवर आले. त्यांनी इ.स. १६८२ मध्ये दादाजी रघुनाथांना जंजिऱ्यावर पाठविले. त्यांनी महिनाभर लढा दिला. दर्यासारंग दौलतखानच्या दीडशे गलबतांच्या आरमाराचाही उपयोग होत नाही हे पाहून संभाजी राजे स्वत: जातीने तेथे आले. वीस हजार फौजेला दाद न देता सिद्दी कासीम जंजिरा शर्थीने लढवीत होता.

संभाजी राजे संतापले. त्यांनी हुकूम दिला, 'राजपुरीचा

डोंगर फोडा! ही (अवघी आठशे मीटर रुंद अन् तीस मीटर खोलीची) टीचभर खाडी बुजवून टाका! समुद्रातला जंजीरा मग आपल्या पायदळाच्या सहाय्याने जिंकून घेऊ.'

झाले सारे कामाला लागले. अर्धीअधिक खाडी बुजवूनही टाकली. जंजिऱ्याचा स्थलमार्ग तयार होऊ लागला. पुन्हा एकदा हा बुलंद दुर्ग स्वराज्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली. पण....

दिल्लीपती आलमगिराची स्वारी स्वराज्यावर चाल करून आली. स्वराज्याचे दुर्दैव आड आले. हा डाव अर्धवट टाकून छत्रपती संभाजी महाराजांना निघून जावे लागले. मग या दिल्लिंद्राच्या वावटळीत स्वराज्याचे दोन छत्रपती गेले. ताराराणीने होते ते स्वराज्य राखले. पुढे शाहूची सुटका झाली. त्यावेळेपर्यंत जंजिरा जिंकणे तर राहूद्याच पण खुद्द स्वराज्याची राजधानी, तख्ताची जागा किल्ले रायगडच 'इस्लागड' बनून सिद्दीच्या ताब्यात गेली होती.

इ.स. १७१६ मध्ये कान्होजी आंग्रे अन् पेशवे यांनी संयुक्त मोहीम काढली. पुन्हा एकदा अपयश पदरी घेऊन तिची समाप्ती झाली.

पुढे १७४६ साली नानाजी सुर्वेने सिद्दीलाच ठार मारले. सिद्दी रहमान घाबरला. आपल्या ताब्यातील बारा महालांपैकी सहा महाल त्याने पेशव्यांना दिले. पण जंजिरा त्याच्याकडेच राहिला. इ.स. १७६१ मध्ये पुन्हा एक स्वारी पेशव्यांनी केली, पण यश काही आले नाही.

नाना फडणिसांनीदेखील जंजिरा जिंकून घेण्याचे प्रयत्न केले. सिद्दीचा वारस बाळूमिया यालाच आपल्या बाजूस वळवून घेतले. पण सिद्दी अब्दुलनंतर बाळूमियाला डावलून सिद्दी जोहार गादीवर आला. हा काटा स्वराज्याचे साम्राज्य झाले तरी सलतच राहिला.

पुढे १९४७ साली भारताला स्वराज्य मिळाले. जंजिऱ्याच्या सिद्दीच्या ताब्यात जाफराबाद इथलं संस्थानही होतं. पण अखेर वल्लभभाई पटेलांच्या कणखर धोरणाने सारी संस्थानं खालसा झाली. त्यात हे संस्थानही नष्ट झाले. स्थानिक प्रजेचा उठावही यशस्वी ठरला. पण तोपर्यंत तब्बल साडेतीन-चारशे वर्षे हा मुलुख सिद्दयांनी मोठ्या जिद्दीनं आपल्या ताब्यात राखला होता. जंजिरा अखेरपर्यंत अजिंक्यच राहिला होता.

असा हा इतिहासात गाजलेला, इतिहास घडवलेला बेलाग जलदुर्ग रायगड जिल्ह्यात मुरूड गावाजवळ आहे. पुण्या-मुंबईहून राज्य परिवहन मंडळाच्या गाड्यांनी मुरूडला पोहोचता येते. पण या दुर्गाभोवती अद्यापही वेढा पडलाय तो रात्रंदिवस गरजणाऱ्या अथांग दर्याचा. शिडाच्या होडीनं तेथवर जाता येतं.

पूर्वाभिमुख अन् समुद्राच्या लाटांशी खेळणाऱ्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवरुन किल्ल्यात प्रवेश होतो. दरवाज्याच्या कमानीचे वर एका पांढऱ्या दगडावर कोरून एक शिलालेख बसवलेला आढळतो. तो अरबी लिपीत आहे. त्यातल्या योहोर या शब्दावरून ते बांधकाम इ.स.१६९४ मध्ये (१११११ हिजरी सनात) झाल्याचे अनुमान काढता येते. कमानीतून आत येताच उजव्या हाताला एक वाघाचे चित्र आहे. त्याच्या चारही पायांत प्रत्येकी एक, शेपटीत एक तोंडात एक असे सहा हत्ती पकडलेले आहेत. हे चित्र उजवीकडील बुरूजाच्या भिंतीवर, तर डावीकडील भिंतीवर एक सिंहीण व मागे वाघ असे कोरलेले आहे. याशिवाय येथे काही अरबी लिपीतील शिलालेखही आहेत. यानंतर समोरची देवडी उजवीकडे ठेवून दुसऱ्या कमानीतून किल्ल्यात प्रवेश करता येतो. त्याच्या फळ्या अद्यापही शाबूत आहेत.

प्रवेशद्वारावर लगेच उजवीकडे एक मंदिरासारखे बांधकाम आहे. पूर्वी येथे रामपंचायतन होते असे मानतात. आता त्यास

'पंचायतन पीर' म्हणतात. तेथे कार्तिकी पौर्णिमेस (नोव्हेंबरात) जत्रा भरते. पूर्वी नबाबातर्फे त्या दिवशी गलिपाचे कापड त्यावर अंथरले जाई.

तेथून पुढे जाताच किल्ल्याच्या दक्षिण भागात एक प्रचंड तलाव आहे. परंतु पाणी अतिशय हिरवेगार आहे. तेच पाणी वापरले जाते. याशिवाय किल्ल्यात वायव्येस आणखी एक तलाव आहे. दक्षिण तलावास लागून एक इमारत आहे.

बालेकिल्ल्यात एक अतिभव्य, ६५-७० मीटर उंचीचा वाडा आहे. त्याला सुरूलखानाचा वाडा म्हणतात. आता वारा, वादळ, ऊन, पाऊस या जोडीला दुर्लक्ष व अव्यवस्था यामुळे याची अगदी दुर्दशा झालेली आहे. याखेरीज गडावर काही पडिक इमारतींचे अवशेष, कबरी व काही जुन्या हिंदू शिल्पांचे अवशेष दिसतात.

किल्ल्याच्या चारही अंगाने असलेल्या तटबंदीस एकोणीस बुरूज आहेत. प्रत्येक बुरूजाचा व्यास २५ मीटर असून तो १०-१५ मीटर उंचीचा आहे. दोन बुरूजांमधील अंतर तीस मीटरहून कमी नाही. ऐन महाद्वाराचे वर असणाऱ्या बुरूजाचे माथ्यावर तीन अजस्त्र तोफा आहेत. ध्वजस्तंभाच्या शेजारील अतिभव्य 'लांडा कासम' पैकी कलाल बांगडी तोफेच्या कानात दोन कड्या आहेत व ती तोफ जंजिरा हस्तगत करण्यास पेशव्यांनी आणली होती. पण त्यात यश न आल्याने ती तशीच किनाऱ्यावर सोडून त्यांना जावे लागले व नंतर सिद्दींनी तिची येथे स्थापना केली.

उरलेल्या सर्व बुरूजांवर दोन ते सात तोफा आहेत. म्हणजे सर्व मिळून किल्ल्यावर दीड-दोनशे तोफा सहज आहेत. वायव्येच्या बुरूजावरून शिवरायांच्या प्रेरणेवरून बांधला गेलेला पद्मदुर्ग ऊर्फ कांसा किल्ला दिसतो व पश्चिमेला 'दर्या दरवाजा' आहे. तेथे काही थडगी आहेत. तेथील, धक्का भरतीच्या वेळी देखील पाण्याखाली

जात नाही. सिद्दीची अनेक पलायने या पश्चिम दरवाज्याने पाहिली आहेत.

जंजिरा व पद्मदुर्गाच्या तट-बुरूजांकडे पाहिले असता एक गोष्ट प्रकर्षाने डोळ्यात भरते, ती म्हणजे जेथे लाटांचा मारा होतो, तेथे दगडी चिरे झिजून गेले आहेत, पण दर्जांमधील, चुना अजून शाबूत आहे.

पूर्वी किल्ल्ल्यावर युरेपियन बनावटीच्या ७ पितळी तोफा होत्या. त्या आता नाहीत. त्यांचे काय झाले असावे हे कळत नाही. सबंध किल्ला पाहावयाचा म्हणजे चार-पाच तास सहज लागतात. आता किल्ल्यात वस्ती नाही. पण मुरूडला इन्स्पेक्शन बंगला व हॉलिडे कँपस् आहेत. तेथे अल्प खर्चात राहता येते.

पुरातत्त्व खात्याने नुकत्याच केलेल्या साफसुफी अन् उत्खननात एक पुरातन शिवमंदिर सापडले आहे. त्यावरून ह्या किल्ल्याची उभारणी राम पाटलाच्या काळी किंवा तत्पूर्वी तर झाली नव्हती ना ? मूळचा हिंदू बांधणीचा किल्ला मामुली डागडुजी करून आपल्या नावावर पूर्ण बांधणी खपविण्याचा हा आणखी एक प्रयत्न तर नाही ना ?

## ११. किल्ले मलंगगड (बाबामलंग ऊर्फ हाजीमलंग) : (जि. ठाणे)

मलंगगड हा किल्ला म्हणून फारसा महत्त्वाचा नाही व विशेष प्रसिध्दही नाही. 'हाजी मलंग' ह्या तेथील पूजनीय स्थानामुळे तो विख्यात आहे. कल्याण ह्या ठाणे जिल्ह्यातील गावाच्या दक्षिणेस साधारणत: १५ किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. कल्याण स्टेशनजवळील एस.टी.स्टँडपासून तेथे जाण्यास बसेसची सोय

आहे. मात्र पायथ्याशी असणाऱ्या वस्तीपासून गडावर जाण्यास पायऱ्यांचा रस्ता आहे. समुद्रसपाटीपासून साडेपाचशे मीटर उंचीच्या ह्या किल्ल्याला फारसा इतिहास नाही.

६ व्या शतकात नलदेव मौर्य नावाचा राजा येथे राज्य करीत होता, असा उल्लेख आढळतो. ठाणे व त्याला लागून असलेल्या रायगड जिल्ह्यातील इतर किल्ल्यांप्रमाणे माथ्यावर अवघड सुळका व खाली थोडकी माची अशीच याही किल्ल्याची रचना आहे.

ठाणे जिल्ह्याच्या व रायगड जिल्ह्याच्या सरहद्दीवरील ह्या किल्ल्यावर बाबा मलंग नावाच्या एक सत्पुरूषाची समाधी आहे. हिंदूच्या मूळ स्थानाला मुस्लीम लोक पूज्य मानून त्याची भक्ती करू लागले व पुढे हक्कही सांगू लागले, पण ते तोकडे पडले. पेशव्यांचे काळापासून तो आजवरही केतकर घराणे ह्या सत्पुरूषाच्या समाधीची पूजा करीत आहेत. आज मात्र मुस्लीम भाविक व असंख्य महारोगी भिकारी यांचे प्रमाण अतिशय आहे. मात्र ह्या ठिकाणच्या किल्लेपणाचा त्यामुळे लोप झाला आहे.

मलंगगडावरील समाधी १७८० सालपर्यंत फारशी प्रसिध्द नव्हती. इंग्रजांनी १७८० मध्ये कल्याण व मलंगगड ही ठाणी मराठ्यांपासून जिंकून घेतली. मराठ्यांच्या फौजांचा उपद्रव चालू होताच. अखेर १७८१ च्या मराठे-इंग्रज तहात ही ठिकाणे पुन्हा मराठ्यांकडे आली. हे सारे मलंगगडावरील सत्पुरूषाच्या कृपेने झाले, अशी पेशव्यांची भावना झाली. त्यांनी कल्याणच्या श्री. काशीनाथ केतकर यांची ह्या पूजास्थानाची व्यवस्था करण्यास पुजारी म्हणून नेमणूक केली.

ह्या समाधीची देखरेख, जीर्णोध्दार आदि कामे केतकरांनी केली. पुढे मुसलमान भक्तांची तेथे जा-ये वाढली व एक मुजावर तेथे झाडलोट करणे, स्वच्छता राखणे आदि कामे करू लागला.

या उपयुक्त गोष्टींना कोणी हरकत घेतली नाही. याचाच फायदा घेऊन १८१७ मध्ये हाजी मलंग बाबा यांचा हा दर्गा आहे व तेथे आमचे पूजास्थान आहे, असा दावा मुस्लीम समाजातर्फ करण्यात आला.

इंग्रज कलेक्टरने या वादात समाधिचीच साक्ष काढली. चिट्ठ्या टाकून जो कौल मिळेल तो मानावा अशी तडजोड निघाली. तीन वेळा चिठ्ठया काढल्या गेल्या. प्रत्येक वेळी कौल केतकर व हिंदूंच्या बाजूने लागला. काशीनाथ पंत केतकरांचे पणतू कृष्णाजीपंत केतकर १९०३ मध्ये निपुत्रिक वारले. त्यांच्या पत्नीने (राधाबाई केतकर) एक दत्तक घेतले. त्यांचे नाव गोपाळराव केतकर. ते व त्यांचे वंशज वहिवाटीच्या हक्काने पूजा करतात व ट्रस्टचेही ते विश्वस्त आहेत.

ह्या सत्पुरूषासंबंधी एक कथा प्रचलित आहे. नल मौर्याच्या वेळी हे या गडाच्या माचीवर येऊन राहू लागले. नळ राजाची मुलगी त्या साधूची सेवाचाकरी करू लागली. पुढे तिने त्यांच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. पण त्यांनी ती मोठ्या निग्रहाने नाकारली, पण ती त्यांची शिष्या बनून सेवा करू लागली. राणीच्या कानावर हे सर्व आले. तेव्हा ती रागावली. तिने त्या पुण्यपुरुषाला अपशब्द वापरले व 'माझी मुलगी परत दे नाहीतर बघ' म्हणून दगड मारण्यास उचलला. तेव्हा त्या पुण्यपुरूषाने तप:सामर्थ्याने युक्त अशी शापवाणी उच्चारली- 'तू दगड होशील.'

त्याप्रमाणे तिचा दगड झाला. ह्या सत्पुरूषाच्या समाधिशेजारील समईसारखा पण उंच दगड आहे तोच तो असे भाविक मानतात. त्यावर दिवा लावतात. पुढे त्या सत्पुरूषाने देह ठेवला. त्याची समाधि बांधली गेली. कालांतराने समाधिची सेवा करीत राहिलेल्या त्या राजकन्येलाही देवाज्ञा झाली. तिची समाधी जवळच बांधण्यात आली.

माघ शुध्द पौर्णिमेला येथे मोठा उत्सव होतो. आजूबाजूच्या परिसरातील असंख्य भक्त व मुस्लीम समाजातील लोकही या यात्रेला जमतात.

प्रत्यक्ष या पूजास्थानाच्या वरही बराच उंच डोंगर आहे. त्याला थोडकी तटबंदी, प्रवेशद्वार, पाण्याची टाकी, बुरूज इ. आढळतात. हा विस्तार अल्प आहे. याशिवाय उंचउंच कातळमाथ्यावर बालेकिल्ला आहे. साखळीच्या सहाय्यानेच वरपर्यंत जाता येते. शे-दीडशे भाविकांत एखाद-दुसराच वर जातो. थोडेसे कठीण असले तरी वर पोहोचल्यावर कुर्ला-मुंबई हा भाग, पनवेलपर्यंतचा मुलुख, माथेरानचा परिसर दिसतो. माहुली, भीमाशंकर, मच्छिंद्रगड, सिध्दगड/सिधगड चंदेरी, पेब, म्हसबाळ, माणिकगड, प्रबळगड, विशाळगड, कर्नाळा असे अनेक किल्ले व गिरीस्थाने येथून दृष्टीस पडतात. बालेकिल्ल्यावर ५-७ मोठी पाण्याची टाकी, काही उंबराची झाडे, मारूतीचे देऊळ, पडका राजवाडा व थोडके बांधकाम आहे. वाघाचे शिल्प (वाटेवरील) बुरूजाजवळील मारूती व गणपती मूर्ती, शिवमंदिर, देवीचे देऊळ इ. गोष्टींवरून हा परिसर हिंदू राजांच्या ताब्यात होता असे वाटते. मुसलमान सत्ता येथे नाममात्रच असावी व बाबा हाजी मलंग हा काल्पनिक पुरूष, तेथील सत्पुरूषाची समाधी दर्गा बनवण्याच्या उद्देशो निर्माण केलेला असावा.

बालेकिल्ल्याला खेटून देवणी नावाचा एक सुळका आहे. बालेकिल्ल्यावर उभे राहून हातात सात दगड घ्यावयाचे व ते त्या देवणीला मारावयाचे. एक जरी त्यास लागला तरी नगारा वाजू लागतो व मनोकामना पुरी होते असे मानतात. प्रत्यक्षात उलट्या वाऱ्यामुळे व अंतरामुळे ते अवघड आहे.

गिर्यारोहकांच्या मनात मात्र ह्या सुळक्यावर चढून जाण्यास कौशल्याचा भाग होता. ते आव्हान सह्यपुत्रांनी स्वीकारले. अवघ्या २८ मीटर देवणी सुळक्याचे आव्हान! पण ते तितकेच कठीण!

मुंबईच्या क्लाइंबर्स क्लबचे श्री. विनायक नाडकर्णी व श्री. एम.आर.अमलडी यांनी नोव्हेंबर १९६२ मध्ये त्यावर चढून जाण्यास प्रथम यश मिळविले. (आधार-दि.कलाइंबर्स क्लब बुलेटीन, खंड ७ वा.एप्रिल १९६४.)

सह्याद्रितील लिंगाणा माथा, रायगडचा भवानीकडा, वाघ दरवाजा, हिरकणी कडा, चंदेरीचा सुळका, कर्नाळ्याचा बुधला, तोरण्याचा बुधला, मलंगगडचा देवणी सुळका ही युरोपच्या आल्पस्‌मधील आव्हानाइतकीच कठीण आव्हाने आहेत. त्यांच्याकडे तुमचे-आमचे कोणाचेच लक्ष नाही. पर्यटन खात्याला त्याची जाहिरात करावीशी वाटत नाही. युवक व क्रीडा संचलनालयाला गिर्यारोहण या क्रीडाप्रकाराबद्दल नफरत आहे. हा खेळच नाही इथपर्यंत म्हणण्याचीही काही जणांची मजल जाते. 'आलिया भोगासी असावे सादर' दुसरे काय?

## १२. माहुली - भंडारगड - पळसगड : (जि. ठाणे)

ठाणे जिल्ह्यात शहापूर - असनगावजवळ एक दुर्गत्रिकुट आहे. माहुली भंडारगड अन् पळसगड मिळून हे बळकट ठाणे निर्माण झाले आहे. मुद्दाम जाऊन पहावे अन् तिथल्या नीरव शांततेत अन् लोभसवाण्या निसर्गात हरवून जावे असे हे ठिकाण आहे.

इतर अनेक किल्ल्यांप्रमाणेच याही किल्ल्याची मूळ उभारणी कोणी केली, हे ज्ञात नाही. पण १४८५ च्या सुमारास हे बळिवंत ठिकाण नगरच्या निजामशाहीचा संस्थापक असणाऱ्या मलिक अहमदच्या ताब्यात आले.

पुढे शहाजीराजे निजामशाहीचे संचालक बनले अन् मुरार जगदेव आदिलशाहीतील महत्वाचे व्यक्तिमत्त्व बनले. त्यांची युती दिल्लीपती शहाजहानला खटकली. त्याच्या इशाऱ्यावरून महंमद आदिलशाहाने मुरार जगदेवाचा हाल करून वध केला अन् त्यांच्या पक्षातील वजीर खावसखानाचा खून करविला. दिल्लीच्या मोगली फौजा अन् आदिलशाही सेना निजामशाही बुडविण्यासाठी शहाजीराजांच्या मागे लागल्या. १६३५ ची अखेर व १६३६ ची सुरुवात या काळातील ह्या घटना. कठीण परिस्थितीत बळकट आश्रयस्थान म्हणून शहाजीराजांनी जुन्नर-शिवनेरीहून जिजाबाई अन् बालशिवबासह माहुलीवर मुक्काम हलवला. खानजमान हा महाबतखानाचा मुलगा अन् मोगली सरदार माहुलीचा वेढा गच्च आवळून बसला. शहाजीराजांनी पोर्तुगीजांची मदत मागविली पण नकारघंटा ऐकून त्यांना शरणागतीशिवाय उपायच राहिला नाही. विजापूरकरांतर्फे मलिक रेहान, सिद्दी मर्जान अन् रणदुल्लाखान या वेढ्यात सहभागी झाले होते.

शहाजीराजांना मोगलांच्या दक्षिण सीमेवरून दूर बंगळूरकडे ठेवावे अशा अटीवर शहाजीराजांची सेवा आदिलशाहीत रुजू करून घेण्यास मोगलांनी मान्यता दिली. रणदुल्लाखानाची मध्यस्थी उपयोगी पडली. निजामशाही बुडाली. शहाजीराजांच्या परिवारात कान्होजी नाईक जेधे अन् कारभारी दादाजी कृष्ण लोहोकरे दाखल झाले. रणदुल्लाखानाकडून मागून घेतलेली ही माणसं हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत शिवाजी महाराजांना फारच मोलाची ठरली.

पुढे १६५८ मध्ये ८ जानेवारी रोजी शिवरायांनी हा किल्ला मोगलांकडून परत मिळविला. पण १६६१ मध्ये तो मोगलांना परत द्यावा लागला. लगेचच तो परत जिंकून घेतला गेला. १६६५ च्या पुरंदरच्या तहात हे दुर्गत्रिकुट परत गमवावे लागले. मनोहरदास गौड हा धोरणी, धूर्त, कर्तबगार सरदार माहुलीवर

दा. क्र. २८६६ दिनांक २६/११/८३
विषय बा.वा. क्र.........

कारभार पाहू लागला. त्याने गडावर बरीच नवी बांधकामे करून घेतली. फेब्रुवारी १६७० मध्ये खुद्द शिवाजीराजांच्या नेतृत्त्वाखाली माहुलीवर केलेला हल्ला अयशस्वी ठरला. दीड हजार मराठी मावळ्यांपैकी तब्बल हजार सैनिक मोगलांनी कापून काढले. मराठ्यांचा दणदणीत पराभव झाला. पण या यशानेदेखील मनोहरदास गौड हबकून गेला. त्याने किल्लेदारी सोडली. त्याच्या जागी अलाविर्दी बेग हा नवा किल्लेदार म्हणून रुजू झाला. १६ जून १६७० रोजी दोन महिन्यांच्या वेढ्यानंतर दोनशे मोगल सैनिक कापून काढून मोरोपंत पिंगळ्यांनी माहुली, पळसगड, भंडारगड स्वराज्यात आणले.

यानंतरचा फारसा इतिहास ज्ञात नाही, महामुंबईच्या ऐन सीमेवर असल्याने 'वन डे हाइक' साठी असंख्य मंडळी माहुलीवर येतात. असनगाव ते माहुली पायथा आता उत्तम रस्ता झाला आहे आणि एकदा आपण अचूक पायवाटेला लागलो की, थेट वरपर्यंत न चुकता येऊ शकतो.

**दुर्गदर्शन.**

गडाचा मूळचा महादरवाजा अतिशय देखणा. एका नाळेच्या तोंडाशी, कातळ खोदून पायऱ्या व पहारेकऱ्यांच्या देवड्या कोरल्या आहेत. त्यापुढे दोन ऐटदार बुरूज झोकात उभारले आहेत. पण आजमितीला 'माची' गाव आडबाजूला पडले आहे आणि या नाळेत केवड्याचे बन निर्माण झाले आहे. या काटावळीतून मार्ग काढणे फारच अवघड झाले आहे. अगदी अलिकडेच 'दुर्गमित्र' या दुर्गवेड्या संस्थेने महादरवाज्यातील पायऱ्या-देवड्या या ठिकाणी साचलेला गाळ, माती, राडारोडा श्रमदान करून स्वच्छ केला आहे. ही मूळची वाट पुन्हा सुरू होणे अगत्याचे आहे.

सध्या पायवाटेने वर आले की एक अडीच-तीन मीटर

उंचीची लोखंडी शिडी आहे. त्यावरून चढून गडमाथा गाठता येतो. हा मार्ग मूळच्या महादरवाज्याच्या वाटेपासून दोनचारशे मीटर दूर आहे. मात्र या वाटेवर किल्ल्यात शिरता शिरताच एक थंडगार पाण्याचे टाके आहे. यातील गाळ दुर्गमित्रने काढून टाकल्याने दुर्गयात्रिकांची उत्तम सोय झाली आहे. येथून डावीकडच्या झाडावळीत न शिरता उजवीकडच्या पायवाटेने मूळच्या महादरवाज्याकडे जाता येते. येथे वरच्या अंगास पाण्याचे टाके व देवड्यांमध्ये मुक्कामाची सोय होऊ शकते. उजवीकडे जाण्याऐवजी सरळ वाटेने तसेच पुढे गेले की, नमाजगीर नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागी आपण पोहोचतो. एक भिंत व काही कलाकुसरीचे दगड येथे आढळतात. एका चिऱ्यावर अपसव्य लिपीत मजकूर कोरलेला आहे. या शिलालेखाचा अर्थ काय होतो, हे कळले नाही. येथून उत्तरेकडे थोडे पुढे गेल्यास एका चिरेबंदी वाड्याचे अवशेष आढळतात. येथून बांबूच्या बनातून जाणारी पायवाट पळसगडाकडे घेऊन जाते.

उत्तरेकडचा पळसगड, मधला माहुली अन् दक्षिणेकडचा भंडारगड अशी मुळात रचना होती. भंडारगडाच्या दक्षिणेस भटजी-नवरा-नवरी असे सुळके व खिंडीच्या अलिकडे एक औरसचौरस डोंगर आहे, सध्या या डोंगरालाच माहुलीचंदेरी या नावाने ओळखले जाते. नाव नसलेल्या डोंगराला नाव देणे वेगळे, पण मुळातच पळसगड नाव असलेल्या डोंगराला छोटा माहुली हे नवे नाव देणे योग्य वाटत नाही. सध्या अशी नावे रूढ करण्याचा सपाटा मुंबईकर भटकंतीप्रिय मंडळींनी लावला आहे. नाणेघाटातील जीवधन किल्ल्याच्या सुळक्याला वांदरलिंगी हे नाव होते त्याला खडापारशी नाव रुढ करण्याचा प्रयत्न चालू आहे. अलंगगड-कुलंगगड यामध्ये असणाऱ्या मदनगडाला मंडणगड किंवा पलंग नाव रुढ करणे हा असाच भाग ! हे प्रयत्न होता

होईल ते टाळले पाहिजेत. सिंहगडासमोरच्या शिखराला चिलीमखडा हे अर्थवाही नाव असताना पोटॅटो पॉईंट हे नाव कशाला? यामुळे गोंधळ तर वाढतातच, पण स्थाननिश्चितीबाबत अडचण होते ते वेगळेच.

नमाजगिराकडून शिडीच्या वाटेकडे परत आले की तेथील टाक्याच्या अलिकडून डावीकडे-पश्चिमेकडे-भंडारगडाच्या दिशेने जाऊ लागले की झाडीतून जाणाऱ्या पाऊलवाटेवर दोन डुक्करतोंडी शिल्पे आहेत, एक वीरगळ आहे. येथेच डाव्या हाताच्या कारवीच्या झाडीत काही सुघड जोतीही आहेत. परंतु तसेच पुढे गेलो की एका मोठ्या तळ्याशी आपण पोहोचतो. तेथेच कारवीमध्ये हरविलेली श्री. माहुलेश्वर मंदिराची जागा आहे. याचीही स्वच्छता दुर्गमित्राने श्रमदानाने केली आहे. येथून पुढचा डोंगरी उंचवटा चढून जाताना दोन स्त्रीयोध्दांचे शिल्प आहे. शेवटी आपण एका दरीच्या माथ्याशी पोहोचतो.

माहुली किल्ला आणि भंडारगड यांच्या दरम्यान एक आडवीतीडवी पसरलेली भलीमोठी खिंड आहे. त्यात उतरून पुढच्या डोंगरावर अनगड वाटेने चढले की आपण भंडारगडाच्या माथ्यावर पोहोचतो. तेथे पश्चिम दिशेला या किल्ल्याचा मुख्य दरवाजा म्हणजे कल्याण दरवाजा आहे. दाराच्या आतील बाजूस एक मराठी शिलालेख आहे.

दरवाजा टांकास बैजदार दुर<br>
गमैगैर ॥ संवतुसतसरसैप<br>
चीसवैरच्या राजयतेस ॥

असं काहीसं कोरलेल्या या उठावाच्या शिलालेखावरून अर्थबोध काहीच होत नाही. येथून खाली उतरण्याची वाट सोपी नाही. चार डोंगर हिंडलेल्या, उंचीची भीती न वाटणाऱ्या, अवघड वाटेने चढण्या-उतरण्याची सवय असल्याने पूर्ण काळजी घेऊन

इथून खाली उतरावे. खालच्या घळीत एक झिजवट, अपसव्य लिपीतील लेख व कोरीव पायऱ्या आहेत.

दरवाज्यामाथ्यावर किंचित् पश्चिमेस एक खांब सोडलेले माठ टाके आहे. त्याबाजूने करंगळी नावाचा सुटावलेला सुळका दिसतो. नवरा-नवरी-भटजी-करंगळी हे सुळके प्रस्तरारोहकांचे आकर्षण ठरले आहे. अनेकांनी त्यावर यशस्वी-अयशस्वी आरोहणे केली आहेत. सरावपूर्ण तयारी, योग्य त्या साधनसामाग्रीची शास्त्रशुध्द मदत, आत्मविश्वास असणाऱ्यांनीच अशा साहसांना हात घालावा. कारण या खेळात चुकीला फक्त 'देहांत प्रायश्चित्त' हीच एकमेव शिक्षा असते. एखादा फारच सुदैवी असला, तर हातपाय मोडून बसतो व जन्मभरची खंत बाळगावी लागते.

भंडारदुर्गावरून माहुलीकडे परत येऊ लागले की, उजव्या-पूर्व कडेने जाऊ लागले की एका डोंगरसोंडेच्या माथ्यावर ऐन कड्याशी हनुमान दरवाज्याचे अवशेष आढळतात. या ठिकाणी श्रीहनुमान व श्रीगणेशाची अतिशय बेताची शिल्पे कोरलेली आहेत. या वाटेने स्थानिक मंडळींखेरीज कोणी फारशी ये-जा करत नाही. वाट अवघड नसली तरी सोपी तर नाहीच, पण वहिवाटीत नसल्याने अडचणीची मात्र आहे.

**शिवरायांची चतुराई.**

मिर्झाराजे जयसिंगाचं धर्मसंकट नवजात हिंदवी स्वराज्याच्या प्राणावरच उठलं. त्या प्रचंड दळभाराशी अन् डोकेबाज, धूर्त जयसिंगाशी दोन हात करणं आवाक्याबाहेर वाटत होतं. मुलुख बेचिराख करणं आणि अश्राप प्रजेला पीडा देणं यामुळे स्वराज्याची नाळ तुटण्याची वेळ आली होती. अशा वेळी थोडं पडतं घेऊन 'शिर सलामत तो पगडी पचास' हे धोरण अंगिकारणे हिताचे ठरणार होते. ही पीडा स्वराज्याबाहेर-आदिलशाही मुलखावर ढकलणे

अन् जेव्हा जयसिंगाचा पाय उत्तरेकडेल पडेल तेव्हा संधी साधून गेलेला मुलूख परत मिळवणे शिवरायांनी नक्की ठरवले.

नामुष्कीचा तह करतानादेखील शिवरायांनी कागदी घोडे नाचविलेच. १९६५ च्या या पुरंदरच्या तहात त्यांनी २३ किल्ले मोगलांना दिले, तर १२ स्वत:कडे राखले, पण पुरंदर, वज्रगड, कोंढाणा, खंडागळा (सध्या दूरदर्शनचा मनोरा असलेला भाग); माहुली, भंडारदुर्ग, पळसगड अशी किल्ल्यांची नावे लिहिताना त्यांनी गडांची संख्या वाढवली अन् प्रत्यक्षात मोगलांच्या हातात काय पडलं ?

पुरंदर, सिंहगड, लोहगड, माहुली हेच काय ते अतिशय मोक्याचे, लढाऊ किल्ले त्यांनी गमावले. पण राजगड, तोरणा, रायगड, प्रतापगड हा स्वराज्याचा गाभा त्यांनी शाबूत राखण्यात यश मिळविले. 'युध्दात जिंकणं अन् तहात गमावणं' हा प्रकार शिवरायांनी होऊ दिला नाही. युध्दात यश अन् तहातही यशच हे त्यांना जमून गेलं.

## १३. किल्ले मुंबई : (महामुंबई)

किल्ले मुंबई ? मुंबईत कुठला आलाय किल्ला !

आज ज्या भागाला आपण फोर्ट म्हणतो तो आहे खरा पूर्वीच्या किल्ल्याचा अवशिष्ट भाग. पूर्वी संरक्षणाचा मुख्य भार मजबूत भिंतीच्या किल्ल्यांवर पडे. मुंबईसारख्या अद्वितीय नैसर्गिक बंदराच्या रक्षणासाठी किल्ला नसता तरच नवल. एकच एक प्रचंड, बुलंद नि बेलाग किल्ला न बांधता, किनाऱ्यावर लहान मोठ्या किल्ल्यांची मालिकाच गुंफली गेली आहे. त्यातला प्रमुख होता मुंबई बेटाच्या दक्षिण भागातला किल्ला, म्हणजेच आपण ज्याला

फोर्ट म्हणतो तो किंवा पूर्वीचा फोर्ट जॉर्ज. याशिवाय मुंबई बेटाच्या पश्चिमेला वरळीचा किल्ला, उत्तरेला माहीमचा किल्ला, धारावीचा किल्ला, शीवचा किल्ला, पूर्वेला शिवडीचा किल्ला असे इतरही प्रमुख किल्ले होते. पैकी माहीमच्या किल्ल्याचा थोडासा भाग व वरळी, धारावी, शीव, शिवडी हे किल्ले बरेचसे शिल्लक आहेत. मात्र दक्षिणेचा मोठा किल्ला त्याचे नावच काय ते शिल्लक आहे. फ्रियर रोडला सेंट जॉर्ज हॉस्पिटलच्या आवारात समाविष्ट असल्याने व बुरुजाची भिंत हॉस्पिटलच्या आवाराच्या भिंतीत गेल्याने ही गोष्ट विशेष लक्षात येत नाही. मात्र ज्या भागात हा किल्ला होता, त्या भागाला अद्यापही किल्ला अगर कोट अथवा फोर्ट म्हणूनच ओळखतात. म्हणजे काप गेले आणि भोके राहिली त्यातलाच हा प्रकार.

प्रत्यक्ष किल्ल्यात कॅसल म्हणजे बालेकिल्ला होता. त्याला चार बुरूज होते. १) फ्लॅग स्टफ बॅस्टिअन म्हणजे निशाणाचा बुरूज, २) दि टँक बॅस्टिअन म्हणजे तलावाजवळचा बुरूज, ३) व ४) त्यांची नावे सापडत नाहीत. किल्ल्यात आत यायला ३ प्रमुख दारे होती. दक्षिणेकडचे अपोलो गेट. पश्चिमेकडचे चर्चजवळचे म्हणून चर्चगेट व उत्तरेकडचे बाजाराकडचे म्हणून बझार गेट.

सध्या या किल्ल्याच्या जागी असलेल्या आय.एन.एस.आंग्रे येथील सागरी वस्तुसंग्रहालयात १६ व्या शतकातील मुंबईच्या किल्ल्याचे व मनोर हाउसचे प्लॅस्टरचे मॉडेल, दर्यासारंग कान्होजी आंग्र्यांच्या आरमारातला नगारा आहे. तर मुंबईच्या राणीच्या बागेतील वस्तुसंग्रहालयात बझारगेट व चर्चगेट या दोन्ही दरवाजांची छायाचित्रे आहेत.

तसे पाहिले तर मुंबईचा प्राचीन इतिहास काही फारसा ज्ञात नाही. पण २३ जून १६६१ रोजी इंग्लंड व पोर्तुगाल

यांच्यात तह होऊन लग्नाचे निमित्ताने हे बेट इंग्लंडला आंदण म्हणून मिळाले. पण तो ताबा प्रत्यक्ष मिळायला १८ फेब्रुवारी १६६४ हा दिवस उजाडला. इंग्रज अधिकारी कुक याने ताबादर्शक म्हणून तेथील मूठभर माती उचलली व काही दगडही घेतले आणि त्या गढीवचा इमारतीच्या तटावरून फेरी मारली. पुढे १६६५ मध्ये डच व मुंबईकर इंग्रजांचा खटका उडाला म्हणून त्यांनी त्याच गढीजवळ सुमारे ५० मीटर लांब असा ओटा किंवा मेढे बांधून त्यावर काही तोफाही चढवल्या. मात्र १६६९ सालच्या लंडनच्या हुकुमानुसार त्या गढीवजा स्थानाचे अधिक भक्कम ठिकाणात रुपांतर करण्यात सुरूवात झाली. ऑंजिअरने हे काम करवून घेतले. पुढे १६८९ मध्ये ओव्हिंगटन या किल्ल्याचे वर्णन पुढील शब्दात केले आहे- 'विषुववृत्तापासून १९ अक्षांशावर असणाऱ्या मुंबई बेटात बेटाच्या दक्षिणेस एक किल्ला भूशिराच्या टोकावर बांधला आहे. त्याच्या दोन्ही अंगांस खाड्या तर आहेतच, पण त्याच्या तीन बुरुजांवरून थेट बंदरावर मारा लागू पडतो तर चवथ्या बुरूजामुळे शहर व किल्ल्यासमोरचे मैदान माऱ्यात राहते. किल्ल्याचा घेर खूप कमी असून त्याचा आकारही वेडावाकडा आहे. तटाच्या आत गव्हर्नरचे निवासस्थान, बंदर, इस्पितळ, डॉक्टरचा बंगला, चर्च, कस्टम हाउस, टांकसाळ, पाण्याचा तलाव व इतर अनेक इमारतीही आहेत.'

सिद्दी व शिवाजी यांच्या भांडणात मुंबईकर इंग्रजांचेही हितसंबंध गुंतलेले होते. १६७२ मध्ये तर सिद्दी याकूब हा मुंबईच्या बंदरातच होता व शिवाजीमहाराजांच्या मुलखातल्या पेण, पनवेल, अलिबाग वगैरे ठिकाणांस उपद्रव देण्याचा त्याचा इरादा होता.

खांदेरी-उंदेरी येथील किल्ले बांधण्याचे १६७९ मध्ये शिवाजीमहाराजांच्या मनात आले. तेव्हा खांदेरीवरील तटबंदी बांधण्याच्या कामी, मुंबईकर इंग्रजांनी मुंबईच्या अभेद्य किल्ल्याच्या

जोरावरच विरोध केला. अर्थात त्यांचा पाड लागला नाही, ही गोष्ट आणखीन वेगळी.

मुंबईच्या ह्या किल्ल्याचे आता दर्शन घडते केवळ फोटोतून किंवा पुस्तकातील वर्णनातून. पैकी बरीच पुस्तकेही खूप दुर्मिळ झाली आहेत. दि. गॅझेटीयर ऑफ बॉम्बे सिटी अँड आयलंड (१९०९), मेन ॲण्ड इव्हेंटस् ऑफ माय टाईम इन इंडिया- सर रिचर्ड टेम्पल (१८८२), थर्टी नाइन इयर्स इन बॉम्बे सिटी, ओरिजन ऑफ बॉम्बे- गर्सन डकुन्हा (१९००), गाईड टू बॉम्बे- जेम्स.एम. मॅकलीन, बॉम्बे ऑफ वेस्टर्न इंडिया (खंड १ व २) - जेम्स डग्लस्, शॉर्ट हिस्टरी ऑफ द अर्ली हिस्टरी ऑफ द टाऊन ॲण्ड आयलंड ऑफ बॉम्बे - पी. बी. जोशी (१९०२), बॉम्बे इन द मेकिंग - बी. एम. मलबारी (१९१०), राईझ ऑफ बॉम्बे - एस. एम. एडवर्डस् (१९०२), बुक ऑफ बॉम्बे - जेम्स डग्लस (१८८३) याशिवाय एशियाटिक सोसायटीच्या 'जर्नल ऑफ द एशियाटिका सोसायटी' या वार्षिकात मुंबईविषयक अनेक लेख आढळतात.

मुंबईच्या नकाशाकडे नजर टाकली की मुंबई बेटाजवळच हॉग बेट, बुचर बेट, घारापुरी बेट, छोटे व मोठे करंजा, खांदेरी, उंदेरी अशी छोटी-मोठी बेटे आहेत. खुद्द मुंबई सात बेटांमधील समुद्र बुजवून तयार झाली आहे. कुलाबा, मुंबई, महालक्ष्मी, वरळी माझगाव, परळ-शिवडी, व माहीम या बेटांमधील समुद्र हटवून सध्याची मुंबई जन्मास आली आहे.

मुंबईलगतच्या मुख्य भूमीवर तर किल्ल्यांचा अक्षरश: सडाच पडला आहे. मलंगगड, चंदेरी, पेब, प्रबळ, इसालगड ऊर्फ विशाळगड, कर्नाळा, माणिकगड, लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना, कोरीगड, घनगड, हे सर्व बेटाच्या दक्षिण भागाकडे, तर पूर्वेकडे कुलाबा, सागरगड, खांदेरी, उंदेरी, चौल-रेवदंडा, कोर्लई जंजिरा, पद्मदुर्ग

आणि उत्तरेस डहाणू, दिंडू, संजान, उंबरगाव, माहीम तालुक्यातील अलिबाग, भवनगड, दातिवरे, माहीम, पाणकोट, शिरगाव, अर्नाळा, वसई, बेलापूर, पारसिक ठाणे, वरसोवा व कल्याण असे किल्ले आहेत. याबाहेर माहुली, राजमाची, सिंधगड, गोरक्षगड, मच्छींद्रगड, बल्लाळगड, गंभीरगड, इंद्रगड, सेगवाह, असाव, अशेर, काळदुर्ग, मनोर, टकमक, तांदुळवाडी, कोज, जीवधन, कामनदुर्ग, गुमतारा, बलवंतगड, बहिरवगड ऊर्फ सारंगा असे अनेक किल्ले आहेत. कुलाबा, जिल्ह्यातले अवचितगड, सुधागड, सरसगड, भोरपगड, कुर्डू ऊर्फ विश्रामगड, तळेगड, घोसाळगड, बीरवडी, सोनगड, मानमड, चांभारगड, लिंगाणा, रायगड, कावळ्या, चंद्रगड, मंगळगड ऊर्फ कांगोरी हेही आहेतच.

ह्यांपैकी असंख्य किल्ल्यांची तर आपण नावेच ऐकली नव्हती असे तुम्ही म्हणाल. खरं तर महाराष्ट्रातील असंख्य तरुणांनी अशा अपरिचीत गडकोट किल्ले अन् दुर्गांवर गेले पाहिजे. त्यासंबंधीची माहिती इतरांना दिली पाहिजे. आता नष्ट होऊ घातलेल्या ह्या इतिहासातील पाऊणखुणा निदान साहित्यात तरी अक्षर केल्या पाहिजेत. महाराष्ट्राचा सह्याद्रि हा मानदंड तर खराच, पण तो जगातला एकमेव 'लँड ऑफ फोर्टस्' आहे. तिथे देशी पर्यटकांना जाण्यात विशेष बरे वाटेल. त्यांना तिथे जायला उद्युक्त करणे खरे तर पर्यटन विकास महामंडळाचे काम आहे. देशी पर्यटकांना तारांकित, वातानुकूलित हॉटेल्स व ऐषआरामी बसगाड्या व इतर प्रवास-साधने आणि ठिकठिकाणी दारुचे गुत्ते यांची अपेक्षा नसते. अनियमित का होईना पण एस.टी. मधला बसून प्रवास, राह्यला छोटीशी खोली(त्यात कॉटस् असल्या तरी तीही त्यांना चैनच), दोन वेळा जेवायला. चार वेळा चहा आणि मोजक्याच पण बऱ्या चवीच्या डिशेस एवढे त्यांना पुरेसे असते.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २८६६ दिनांक २८/११/८३
विषय बा.वा. क्र. ........
BVBK-0402866

महाराष्ट्राच्या भूगोलाला इतिहास प्राप्त करून देणाऱ्या किल्ल्यांवर केव्हा? कसे? अन् कशासाठी जावे? याचे उत्तर या पुस्तकात मिळेल. किल्ल्यांवर जाण्याआधी पुरेशी माहिती जमवून गेले असले तर दुर्गदर्शन अधिक नेटकेपणाने घडते. हा इतिहास जिवंत केला आहे, शेकडो किल्ले पायी हिंडून पाहिलेल्या प्र. के. घाणेकर यांनी. या पुस्तकांच्या समवेत तो तो किल्ला प्रत्यक्ष हिंडून पाहिला की आपल्या भ्रमंतीला एक निश्चित दिशा मिळेल. 'साद सह्याद्रिची - भटकंती किल्ल्यांची' ह्या नव्या स्वरूपात तुम्हाला निश्चित आवडेल.

**प्रकाशक**

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह.